१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, सोमवार २५ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-८१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 81 Marathi - Daily - Mumbai, 25 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

White House वर गोळीबार! ट्रम्प सुरक्षित?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# अमेरिका-इराणमध्ये अखेर शांतता करार होणार

## वाटाघाटी निश्चित! अंतिम तपशिलावर चर्चा सुरु

■ तेहरान

**अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून धुमसत असलेले आखाती युद्ध संपण्याच्या दृष्टीने आता निर्णायक घडामोडी घडत आहेत. गेले काही दिवस सुरू असलेल्या चर्चांमधून दोन्ही देश शांतता करार करण्याच्या अगदी जवळ पोहोचले आहेत, असे वृत्त आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज सांगितले की, इराणसोबतचा शांतता कराराच्या बहुतांशी वाटाघाटी निश्चित झाल्या आहेत. औपचारिक घोषणेपूर्वी कराराच्या अंतिम तपशिलावर चर्चा सुरू आहे. भारताच्या दौऱ्यावर आलेले अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनीही काही तासांत चांगली बातमी ऐकायला मिळेल, असे वक्तव्य केल्याने अमेरिका-इराण कराराला दुजोरा मिळाला आहे.**



**इराण** आणि अमेरिकेची चर्चा यापूर्वी अनेकदा फिस्कटली होती. दोन्ही देशांनी एकदाही समोरासमोर बसून बोलणी केली नाही. दोन्ही देश सामंजस्याची भूमिका घ्यायला तयार नसल्याने वाटाघाटी होत नव्हत्या. मात्र, गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय दबाव आणि बदलत्या परिस्थितीत पाकिस्तानसारख्या मध्यस्थामार्फत ही चर्चा सुरू होती. तिला आता यश मिळताना दिसत आहे.

करारानुसार इराणने आपला अत्यंत समृद्ध युरेनियमचा साठा सोडण्यास तत्त्वतः सहमती दर्शवली आहे, असे सांगितले जात आहे. सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी यापूर्वी हा युरेनियम साठा देशाबाहेर पाठवण्यात येणार नाही, असे सांगितले होते. त्यामुळे ही सहमती एक मोठा बदल मानला जात आहे. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेनुसार, इराणकडे सुमारे ४०० किलो इतका ६० टक्के शुद्धतेपर्यंत समृद्ध युरेनियमचा साठा आहे. तो शस्त्रनिर्मितीच्या जवळच्या स्तरावर मानला जातो. हा मुद्दा आतापर्यंत चर्चेतील सर्वात मोठा अडथळा होता. अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चांमध्ये सुरुवातीला किमान तत्त्वतः सहमती आवश्यक असल्याचे अमेरिकेचे मत होते. आता पुढील ३० ते ६० दिवसांत इराणच्या युरेनियम साठ्याच्या व्यवस्थापनाबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. मात्र, हा साठा नष्ट करायचा, कमी करायचा की, देशाबाहेर हस्तांतरित करायचा, याबाबत अद्याप अंतिम स्पष्टता नाही. मात्र इराणने वाटाघाटींमध्ये समृद्ध युरेनियमचा विषय असल्याचा इन्कार केला.

अमेरिका आणि इराण होर्मुजची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यास सहमत झाल्याचे सांगितले जात आहे. होर्मुजची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल व्यापार मार्गांपैकी एक मानली जाते. जागतिक तेल वाहतुकीपैकी २० टक्के तेल वाहतूक या मार्गाने होते. युद्धामुळे ती बंद झाल्याने जागतिक तेल बाजारपेठ आणि पुरवठा साखळीवर लक्षणीय परिणाम झाला आहे. त्यामुळे अनेक देशांनी ती खुली करण्याचे आवाहन अमेरिका आणि इराणला केले होते. परंतु याबाबतीत दोन्ही देशांनी ताठर भूमिका घेतल्याने गेले १२ आठवडे होर्मुजमधून तेलवाहतूक जवळजवळ ठप्प झाली होती. आता दोन्ही देशांत करार झाल्यास ही सामुद्रधुनी टप्प्याटप्प्याने सुरू केली जाईल.

ट्रम्प यांनी संभाव्य कराराचे वर्णन 'शांततेशी संबंधित सामंजस्य करार' असे केले आहे. ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' वरीलआपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, अमेरिका, इराण आणि इतर विविध देशांमध्ये करार अंतिम करण्याच्या अधीन राहून मोठ्या प्रमाणात वाटाघाटी झाल्या आहेत. इस्त्रायलचे पंतप्रधान बिबी नेतान्याहू यांच्याशी माझा दूरध्वनीवरून संवाद झाला, जो देखील खूप चांगला झाला. कराराच्या अंतिम बाबी आणि तपशिलांवर सध्या चर्चा सुरू असून, ते लवकरच जाहीर केला जाईल.

» पान ७ वर

## थोडक्यात...

### पुणे मेट्रोमध्ये पावसाचे नाही तर तांत्रिक बिघाडामुळे पाणी

**पुणे** - पुण्यात झालेल्या जोरदार पावसानंतर मेट्रो कोचमध्ये पाणी साचल्याचा एक व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये मेट्रोच्या डब्यात पाणी साचलेले दिसत असल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम आणि चर्चांना उधाण आले होते. हे पावसाचे पाणी नसून तांत्रिक बिघाडामुळे ही घटना घडल्याचे स्पष्टीकरण पुणे मेट्रो प्रशासनाने दिले आहे. पुणे मेट्रोचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी चंद्रशेखर तांबवेकर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, ही घटना २१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६.४० वाजण्याच्या सुमारास मार्गिका क्रमांक २ वरील रामवाडी स्थानक येथे ट्रेन संच क्रमांक ५ मध्ये घडली होती. मेट्रोमधील वातानुकूलन यंत्रणेच्या पाणी निचरा प्रणालीमध्ये अडथळा निर्माण झाल्याने ही समस्या उद्भवली. धुळीमुळे निचरा पाईप बंद झाल्याने वातानुकूलन यंत्रणेतून तयार होणारे पाणी बाहेर पडू शकले नाही आणि ते थेट डब्यात साचले. घटना लक्षात येताच ट्रेन चालकाने तत्काळ याची माहिती नियंत्रण कक्षाला दिली.

### बंगालमध्ये आता बकरी ईदची दोन ऐवजी एक दिवस सुट्टी

**कोलकाता** - पश्चिम बंगाल सरकारने बकरी ईदची सुट्टी पूर्वीच्या दोन दिवसांवरून कमी करून एक दिवस केली आहे. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील मागील सरकारने दोन दिवसांची सुट्टी जाहीर केली होती. मात्र, राज्य सरकारने नव्या आदेशानुसार २८ मे गुरुवार हा बकरी ईदचा अधिकृत सुट्टीचा दिवस घोषित केला आहे. आदेशात असेही नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वी जाहीर केलेल्या २६ मे आणि २७ मेच्या सुट्ट्या आता रद्द करण्यात आल्या आहेत. पश्चिम बंगालमध्ये नुकतीच विधानसभा निवडणूक पार पडली. या निवडणुकीत पहिल्यांदाच पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे सरकार आले आहे. सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

## राज ठाकरे आज पश्चिम मुंबई दौऱ्यावर! नव्या शाखांचे उद्घाटन

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे उद्या २५ मे रोजी पश्चिम मुंबईचा दौरा करणार असून, पक्ष संघटनाबांधणी आणि कार्यकर्त्यांशी संवाद यावर त्यांचा विशेष भर असणार आहे. अंधेरी, जोगेश्वरी, दिंडोशी आणि वर्सोवा या भागांमध्ये राज ठाकरे विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार असल्याने मनसे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या दौऱ्यादरम्यान राज ठाकरे कार्गो विमानतळ परिसरातील महाराष्ट्र नवनिर्माण हवाई कामगार सेनेच्या कार्यालयाला भेट देणार आहेत. विमानतळ परिसरातील कामगारांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्याबरोबरच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशीही ते संवाद साधणार आहेत. तसेच पश्चिम मुंबईतील काही नव्या मनसे शाखांचे उद्घाटनही राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. पश्चिम उपनगरांमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.



## अमित ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त आ. आदित्य ठाकरे 'शिवतीर्थ'वर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र आणि मनसे नेते अमित ठाकरे यांचा आज वाढदिवस होता. यानिमित्त उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी थेट 'शिवतीर्थ'वर जाऊन अमित ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



त्यांच्या उपस्थितीत अमित ठाकरे यांनी केक कापला. मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर या दोन युवा नेत्यांची ही पहिलीच भेट ठरली. यावेळी शिवतीर्थवर कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. वाढदिवस साजरा करताना मनसे कार्यकर्त्यांनी इंग्रजी गाण्यांऐवजी मराठीतच गाणी गाऊन शुभेच्छा दिल्या. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून आणलेल्या खास केकने सर्वांचे लक्ष वेधले. देशभरात चर्चेत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर या केकवर 'नीट हटवा, देश वाचवा' असा संदेश देण्यात आला होता.

## ट्रम्प उपस्थित असताना व्हाईट हाऊस परिसरात गोळीबार! हल्लेखोर ठार

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या वॉशिंग्टनमधील व्हाईट हाऊसबाहेर अंधाधुंद गोळीबार झाला. विशेष म्हणजे ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये असतानाच हा हल्ला झाला. यात गोळीबाराच्या तब्बल २० फेऱ्या झाडण्यात आल्या आहे. गेल्या महिनाभरात अमेरिकेचे व्हाईट हाऊस परिसरात गोळीबाराची ही तिसरी घटना घडल्यामुळे खळबळ उडाली आहे. सिक्रेट सर्व्हिसच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चकमकीत हा गोळीबार करणाऱ्या हल्लेखोराला गोळ्या घालून ठार करण्यात आले.



काही दिवसांपूर्वीच वॉशिंग्टनमधील एका हॉटेलमधील डिनर कार्यक्रमाला ट्रम्प उपस्थित असताना गोळीबाराची घटना घडली होती. कालच ट्रम्प यांची कन्या इवांका ट्रम्प यांच्या हत्येचा कट उघडकीस आला. या घटनेला दोन दिवसही उलटत नाही तोच व्हाईट हाऊसबाहेर गोळीबाराची घटना घडली आहे. सिक्रेट सर्व्हिसच्या या यंत्रणेने 'एक्स' वर प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, सायंकाळी सुमारे ६ वाजल्यानंतर १७व्या स्ट्रीट आणि पेनसिल्व्हेनिया अव्हेन्यू परिसरात संबंधित व्यक्तीने आपल्या बॅगेतून शस्त्र बाहेर काढत गोळीबार सुरू केला. त्यानंतर सिक्रेट सर्व्हिस अधिकाऱ्यांनी प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला.

## फडणवीसांनंतर एकनाथ शिंदे रविशंकर यांच्या आश्रमात

■ बंगळुरू

**आध्यात्मिक** गुरू श्री श्री रविशंकर यांच्या बंगळुरूमधील आश्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही भेट दिल्याने चर्चांना उधाण आले आहे. त्याआधी शिंदे यांनी अचानक दिल्ली दौरा केल्यानेही भुवया उंचावल्या आहेत.

एकनाथ शिंदे यांनी बंगळुरूमधील 'आर्ट ऑफ लिव्हिंग' फाऊंडेशनच्या आश्रमात आयोजित विशेष कार्यक्रमाला हजेरी लावली. यापूर्वीही त्यांनी श्री श्री रविशंकर यांच्या विविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवली होती. फडणवीस यांनी १५ मे रोजी या आश्रमाला भेट देत गुरुदेवांच्या ७० व्या जन्मोत्सव आणि संस्थेच्या ४५ व्या वर्धापनदिन सोहळ्यात सहभाग घेतला होता. दरम्यान, शिंदे यांनी आश्रम भेटीपूर्वी अचानक दिल्ली दौरा केल्यानेही राजकीय चर्चांना वेग आला. ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्यासाठी गेले होते, अशी माहिती आहे. ही संभाव्य भेट विधान परिषदेच्या निवडणुकीतील

» पान ७ वर

## विद्यार्थ्यांवर पाणी शिंपडत 'एम्स'ची हमी

■ मुंबई

**नीट-यूजी** २०२६ पेपरफुटी प्रकरणात आरोपी व 'रेणुकाई करिअर सेंटर'चा संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर वर्गात

### मोटेगावकरचा नवा व्हिडिओ

विद्यार्थ्यांवर पाणी शिंपडतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर शैक्षणिक क्षेत्रातून, पालकांमधून आणि विशेषतः अंधश्रद्धा निर्मूलन व विज्ञानवादी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून तीव्र व संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. दुसरीकडे आरोपी शुभम खैरनारला आज ६ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.



व्हिडिओमध्ये मोटेगावकर वर्गातील बेंचवर उभे राहून विद्यार्थ्यांवर पाण्याचा तांब्या आणि आंब्याच्या पानांच्या सहाय्याने पाणी शिंपडताना दिसत आहेत. एवढेच नाही, तर 'तुम्ही सगळे थेट एम्सला लागणार आहात' असे म्हणत ते विद्यार्थ्यांना जणू काही यशाची 'हमी' देत असल्याचे दिसते. विज्ञान शिकवणाऱ्या एका प्राध्यापकाकडून अशा प्रकारचे कृत्य झाल्यामुळे शिक्षण क्षेत्रातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मेहनत, अभ्यास आणि सातत्य याऐवजी अशा अंधश्रद्धायुक्त पद्धतीने यश मिळेल, असा संदेश देणे हे विद्यार्थ्यांची दिशाभूल करणारे असल्याची टीका होत आहे. त्याचबरोबर

» पान ७ वर

## नीट परीक्षेचा पाचवा बळी
### १८ वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

■ कलबुर्गी

**राष्ट्रीय** पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट-यूजी) रद्द झाल्यानंतर निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे युवक आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यातील १८ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नीट परीक्षेशी संबंधित तणावामुळे आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता पाचवर पोहोचली आहे.

मृत विद्यार्थिनीच्या वडिलांनी सांगितले की, मुलीला बारावीच्या परीक्षेत ९२ टक्के गुण मिळाले होते. नीट परीक्षाही तिची चांगली झाली होती. आमच्या कुटुंबात कोणतीही अडचण किंवा तणाव नव्हता. आम्ही आनंदाने राहत होतो. ती परीक्षेत चांगली कामगिरी करून आली होती. पुन्हा परीक्षा द्यावी लागणार या विचारामुळे तिच्या मनात ताण निर्माण झाला असावा. ती चांगली अभ्यासू होती. सर्व काही व्यवस्थित सुरू होते, पण तिच्या मनातील वेदना आणि संघर्ष आम्हाला समजू शकले नाहीत.

याआधी राजस्थानमधील सीकर येथे २२ वर्षीय प्रदीप मेघवाल या विद्यार्थ्याने आत्महत्या केली होती. तो गेली तीन वर्षे नीट परीक्षेची तयारी करत होता.

## कॉकरोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट अभिजित दीपकेनेच बंद केल्याचा आरोप

■ मुंबई

**कॉकरोच** जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके याने सरकारने आपली वेबसाईट ब्लॉक केल्याचा दावा केल्यानंतर सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला आहे. अनेक एक्स वापरकर्त्यांनी त्याच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ही वेबसाईट त्याने स्वतःच बंद केल्याचा आरोप केला आहे.

काही युजर्सनी तांत्रिक पुरावे आणि स्क्रीनशॉट्स शेअर करत सांगितले की, संबंधित डोमेन सध्या 'क्लायंटहोल्ड' स्थितीत आहे आणि ते फक्त भारतातच नव्हे तर जगभरातूनच बंद आहे. त्यामुळे ही सरकारी बंदी नसून डोमेन स्तरावरच वेबसाईट निष्क्रिय झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणावर तांत्रिक चर्चा देखील रंगली आहे. मोहित मिश्रा यांनी प्रश्न उपस्थित करत विचारले की, 'जर डीएनएस रेकॉर्डच उपलब्ध नाहीत, तर वेबसाईट स्वतःच डिलीट केली असण्याची शक्यता आहे का? हॅक झाल्यास डीएनएस रेकॉर्डही हटवले जाऊ शकतात का? काहींच्या मते, जर सरकारने वेबसाईट ब्लॉक केली असती, तर साधारणपणे अधिकृत आदेश किंवा नोटीस दिली गेली असती. त्यामुळे ही बाब 'सेल्फ-सस्पेन्शन'




» पान ७ वर

## शासकीय धान्य गोदामातील माथाडी कामगारांचे आज धरणे आंदोलन

■ मुंबई

**राज्यातील** शासकीय धान्य गोदामांमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र सुरक्षा रक्षक व माथाडी कामगार कृती समितीच्या नेतृत्वाखाली २५ आणि २६ मे २०२६ रोजी राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती हिंद मजदूर सभा महाराष्ट्र कौन्सिलचे अध्यक्ष निवृत्ती धुमाळ यांनी दिली.

राज्यातील तालुका स्तरावरील शासकीय धान्य गोदामांमध्ये सुमारे १० ते ११ हजार नोंदणीकृत माथाडी कामगार कार्यरत आहेत. या कामगारांवर माथाडी कायदा लागू असून, ते दीर्घकाळापासून या क्षेत्रात काम करत आहेत. मात्र, राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने २४ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे या कामगारांवर बेरोजगारीचे संकट ओढावले आहे. या निर्णयानुसार 'द्वारपोच योजना' लागू करण्यात आली असून, गोदामातील कामगारांना काम कमी मिळण्याची शक्यता आहे. तसेच वाहतूक ठेकेदारांना स्वतःचे कंत्राटी कामगार नेमण्याची परवानगी देण्यात आल्याने विद्यमान कामगारांचे रोजगार धोक्यात आले आहेत.

## चांगे-७ मोहिमेद्वारे चीन करणार चंद्रावरील संसाधनांचा अभ्यास

**चीनने आपल्या महत्त्वाकांक्षी चंद्र मोहिमेअंतर्गत आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे. चीनची 'चांगे-७' ही रोबोटिक चांद्र मोहीम यंदाच्या वर्षाच्या अखेरीस प्रक्षेपित केली जाणार आहे. तिचे मुख्य लक्ष्य चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांचा अभ्यास करणे आहे. या मोहिमेद्वारे भविष्यात चंद्रावर संशोधन केंद्र उभारण्याच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती गोळा केली जाणार आहे.**

■ बीजिंग

**चीनच्या** मानवी अंतराळ संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, चांगे-७ ही मोहीम अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असणार आहे. या मोहिमेत चंद्राभोवती प्रदक्षिणा घालणारे यान, चंद्रावर उतरणारे लँडर, संचार व्यवस्था आणि उडी मारत विविध भागांचा अभ्यास करणारी यंत्रणा यांचा समावेश असेल. त्यामुळे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील कठीण आणि कमी-अभ्यास झालेल्या भागांचा अधिक बारकाईने शोध घेणे शक्य होणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश चंद्रावर पाण्याच्या बर्फाचे अस्तित्व शोधणे हा आहे. वैज्ञानिकांच्या मते, चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील काही भाग कायम सावलीत असल्याने तेथे बर्फाच्या



स्वरूपात पाणी असण्याची शक्यता आहे. भविष्यात मानवी वसाहती किंवा संशोधन केंद्र उभारण्यासाठी हे पाणी अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते.

## शिवाजी कोण होता? पुस्तक प्रकरणी आ. गायकवाडांच्या चौकशीला मंजुरी

■ बुलडाणा

**शिंदे** गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ आणि धमकी दिली होती. आता या प्रकरणात गायकवाड यांच्या पोलीस चौकशीला जिल्हा न्यायालयाने परवानगी दिली आहे. या प्रकरणात गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याकडून दबाव टाकला जात असल्याचा गंभीर आरोप प्रशांत आंबी यांनी केला आहे.

प्रशांत आंबी म्हणाले, आमदार संजय गायकवाड यांनी स्वतः हा आवाज माझाच असल्याचे मान्य केले आहे. धमकीचा फोन त्यांच्याकडूनच आला होता. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हायला हवा. त्यांच्या कार्यकर्त्यांकडून अजूनही मला फोन येत आहेत. आई-बहिणीवरून शिवीगाळ केली जात आहे.

मात्र आम्ही या धमक्यांना भीक घालत नाही. याआधी आम्ही कोणतीही तक्रार दिली नव्हती. काही तरुण स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे होते. आता त्यांचे धाडस वाढत आहे. चार दिवसांपूर्वीही मला धमकीचा फोन आला होता. माझ्याकडे दोन ते तीन हजार दूरध्वनी नोंदी प्रलंबित आहेत. उद्या मी कोल्हापूर पोलिसांकडे लेखी तक्रार देणार आहे. आम्ही मुख्यमंत्र्यांकडे दाद मागणार नाही. रस्त्यावरची लढाई लढणार आहोत.

नवाकाळ
Email- contact@navakal.in ▸ www.navakal.in ▸ /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

लोअर परेल/चिंचपोकळी येथे ई-बाईकवर डिलीव्हरीसाठी (पगार 18000 पर्यंत) आणि गोडाऊनमध्ये कामासाठी मुले (पगार 13 ते 14000) पाहिजेत. संपर्कः **9320064643** किंवा व्हॉट्सअॅप क्रमांक **8080084843** वर Hi पाठवा {NC260601}

जोगेश्वरीस्थित AV कंपनीला फ्रेशर/ अनुभवी टेक्निशियन (ITI/ DIPLOMA) मुले पाहिजेत. संपर्क V- Tech- **9167252541** {NC260646}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे- वांद्रे, रेस्टॉरंटसाठी. पगारः 19000+PF, ESIC, जेवण, राहणे ३ सुट्टी. संपर्कः **8291856090/ 8291107497** {NC260635}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पँट्रीबॉय- मुलुंड, दादर, गोवंडी, वरळी, मुंबईसेंट्रल, ठाणे, **8422880511/ 8291056761/ 8422880515/9221560330/ 9326200875** {NC260571}

थर्मल प्रिंटींग आणि Bar Tender Software चे knowledge असलेले Male / Female भांडुपयेथे पाहिजेत. वय 30 वर्षापर्यंत. संपर्क : **9137590722.** {NC260598}

फॅब्रिकेटर, वेल्डर, कारागीर, हेल्पर पाहिजेत. वेतन. 30,000. संपर्क. **8652471232** {NC260607}

दादर येथे फ्रेश बी.कॉम. अकाऊंट असिस्टंट पाहिजेत. टॅली, वर्ड, एक्सेल आवश्यक. तसेच १०वी/ १२वी पास/ नापास ऑफीस बॉय पाहिजेत. वेस्टर्न लाइनवर राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्कः **02224228330/ 8104955630** {NC260650}

## पाहिजेत

FMCG प्रोडक्ट्सच्या डिलिव्हरीसाठी ड्रायव्हर आणि लोडर पाहिजेत. टाइम 9.30 ते 8. सालचा दिवाळी बोनस आणि पगार (Sunday Off).- **9930021927, 7977108433.** {NC260616}

ऑफसेट प्रिंटिंगचा अनुभव असलेले सुपरवायझर, प्रिंटर, पेस्टर पाहिजेत. उत्तम वेतन **9324804791** {NC260619}

वॉलपेपर्सच्या शोरुमसाठी प्युन पाहिजेत. अरीहंत, शॉप - 11, शिवगंगा अपार्टमेंट, झवेर रोड, मुलुंड (वेस्ट), **9322246349.** {NC260621}

प्रिंटींग प्रेसमध्ये कोमोरी मशीन LS 429 with UV कोटरसाठी प्रिंटर, फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. शिफारस (Reference) देणाऱ्या व्यक्तीला 3000/- रुपयांचे बक्षीस मिळेल. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC260656}

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/ महिला पाहिजेत. **9987577655** {NC260667}

10/12 तास होम पेशंट ड्यूटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला पर डे. **9372767739 / 8452061740** {NC260614}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटर :**9819426634/ 9969529162** {NC260638}

पंचिंग ऑपरेटर/ बाइंडिंग हेल्पर, (महिला/पुरुष) कामासाठी पाहिजे. घाटकोपर (प.) संपर्क- **9167242621/ 9167242625** सकाळी १० ते संध्याकाळी ७.३० पर्यंत कॉल करा {NC260645}

ऑफसेट प्रिंटरची नॉन-वोव्हन बॅग टुकलर ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी ऑपरेटर आणि स्क्रीन प्रिंटर हेल्पर डिलीव्हरी बॉय नेपच्यून प्रिंटर भायखळा (पूर्व) **9869081515** {NC260673}

## पाहिजेत

घाटकोपरमध्ये पार्ट टाईम ड्रायव्हर पाहिजे. 9.30 ते 2.30. पगार- 10k. **9819439898** {NC260640}

ऑफीस मध्ये अनुभवी हाऊसकीपिंग ladies पाहिजे BKC Kurla **9699927271** {NC260668}

सकाळी 9-2 सिनिअर सिटीझनसाठी घरकाम करणारी 35-50 वयाची बाई पाहिजे पगार 12000+ 500 प्रवासभत्ता संपर्क **9820149975** {NC260672}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

लोअर परेल, प्रिंटिंग प्रेसमध्ये पंचिंग ऑपरेटर त्वरित पाहिजे. पंचिंग ऑपरेटर पगार = १८०००-२२०००. संपर्क- **9320307848/ 9653179228** {NC260592}

डिलिव्हरी आणि ऑफिस कामासाठी कामगार पाहिजे. मरोळ, अंधेरी येथे संपर्कः **9892934566** {NC260611}

नामांकित कंपनीमध्ये हेल्थकेअर सर्वे/प्रमोशनसाठी दहावी ते पदवीधर मुली/स्त्रिया पाहिजेत. फिक्स पगार - १५०००/- कांजुरमार्ग- **7302037159/ 9223222843** {NC260644}

राममंदिर पूर्व, मुंबई येथे कोमोरी ऑटोप्लेट मशिन २०x२८ साठी प्रिंटर,बॉयलर व बाईंडर पाहिजेत. संपर्क : **9320882148** {NC260586}

ऑफीस बाहेर कामासाठी मुले पाहिजे. पगार 12000/- + प्रवास भत्ता. प्रत्यक्ष भेटा.. ग्लोबल सोल्युशन, ४०२ साई आर्केड, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई- 400080 {NC260674}

CCTV आणि SOLAR इंस्टॉलर पाहिजे. पगार २५०००/- पासून + प्रवास भत्ता. प्रत्यक्ष भेटा. ग्लोबल सोल्यूशन, ४०२ साई आर्केड, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई- 400080 {NC260675}

## पाहिजेत

विलेपार्ले (पूर्व) येथील मॉड्युलर फर्निचरमध्ये सुतारासोबत काम करण्यासाठी एका मदतनीसाची आवश्यकता आहे. दुचाकी चालवण्याचा परवाना आवश्यक, वय २५-३५, कामाची वेळ सकाळी ९.३० ते रात्री ८.३०. पगारः ₹ ७०० अधिक गाडी भाड्यापोटी प्रतिदिन ₹५०. संपर्कः **9820149975** {NC260671}

कोमोरी फोर कलर प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर, पेपर, प्रिंटिंग अनुभव असलेले सुपरवायझर पाहिजेत, लॅमिनेशन मशीन ऑपरेटर पाहिजेत. डोंबिवली स्टेशनपासून पिकअप ड्रॉपची सुविधा श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो.नं. **9167736969** {NC260676}

फॅक्टरीमध्ये कामासाठी हेल्पर पाहिजेत दीपक हार्डवेअर मार्ट लोअर परेल 9 ते 6 संपर्क **7021428720** {NC260677}

## Situation Vacant

WANTED FOR SMALL ENGINEERING UNIT IN BHAYANDAR TURNER FITTER, MACHINISTS & HELPER. SALARY AS PER EXPERIENCE- **9820280495** {NC260642}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# गोव्यातील 'मानकुराद'चा हंगाम अवकाळीमुळे संपला

■ पणजी

**अवकाळी** पावसामुळे गोव्यात 'मानकुराद' आंब्याचा मुख्य हंगाम व त्याचा घमघमाट आता जवळपास संपला आहे. सुरुवातीला ६ हजार रुपये डझनपर्यंत गेलेले मानकुरादचे दर नंतर आवक वाढल्यामुळे ३०० ते ५०० रुपये डझनपर्यंत घसरले होते. आता मानकुरादची जागा पावसाळी आंब्यांनी घेतली आहे.

हंगामाच्या सुरुवातीलाच 'मानकुराद' आंब्याचा दर ६ हजार रुपये प्रति डझन इतका होता. पण पीक आल्यानंतर बाजारात अचानक आंब्याची मोठी आवक झाली आणि दोन महिन्यांच्या आत 'मानकुराद'चे दर ३०० रुपये डझन इतके खाली आले. आंब्याचा एवढा मोठा साठा तयार झाला होता की, आंबे कुजण्याच्या भीतीने शेतकऱ्यांनी ते स्वस्त दरात विकून टाकले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

### पावसाळी आंबा हंगाम सुरू

'मुसराद,' 'नीलम; 'रत्ना'चा हंगाम सुरू. आता हापूस 'मानकुराद' या आंब्यांचा हंगाम संपला आहे. काही प्रमाणात हे आंबे अजूनही बाजारात उपलब्ध आहेत. हे दोन्ही आंबे उन्हाळ्याच्या दिवसांत तयार होतात. आता सध्या 'मुसराद', 'नीलम आणि 'रत्ना' या आंब्यांच्या जातीचा हंगाम सुरू झाला आहे. हे आंबे पाऊस सुरू झाल्यावर पिकतात. तसेच काही भागांत 'रायवळ' आंबे (घोटा) देखील उपलब्ध आहेत.

# आता गोव्यातील समुद्रात पिंजरे उभारून मासे पाळणार

■ मडगाव



**गोव्यातील** समुद्रामध्ये विशेष पिंजरे उभारून मासे पाळण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. गोवा राज्य मेरिकल्चर धोरण २०२० नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे मासेबंदीच्या काळातही नागरिकांना ताजे समुद्री मासे उपलब्ध होणार असल्याचा दावा सरकारने केला आहे.

या प्रक्रियेत समुद्राच्या खुल्या पाण्यात किंवा खाडीच्या भागात तरंगणारे जाळीदार पिंजरे उभारून त्यात माशांचे संवर्धन केले जाते. या पिंजऱ्यांमध्ये साधारणपणे मान्सूननंतर चणक, इसवण, सी बास आणि कोबिया यांसारख्या उच्च दर्जाच्या आणि महागड्या माशांची पैदास केली जाते. पिंजऱ्यात सोडलेले माशांचे छोटे बीज किंवा अंडी ७ ते ८ महिन्यांत विक्रीयोग्य आकाराचे होतात.

राज्य सरकारने आता झोन बी-१ आणि झोन बी-२ असे दोन पिंजरे उभारण्यास परवानगी दिली आहे. सरकारने या पिंजऱ्यांसाठी नाममात्र वार्षिक शुल्क निश्चित केले आहे. वापरल्या जाणाऱ्या समुद्र क्षेत्राच्या आकारानुसार शुल्क आकारले जाणार आहे. इच्छुकांनी प्रकल्प अहवाल सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## देश विदेश

# बलुच लिबरेशन आर्मीच्या पहिल्या महिला कमांडरचा व्हिडिओ चर्चेत

■ क्वेट्टा



**पाकिस्तानातील** बलुचिस्तान प्रांतात सक्रिय असलेल्या बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या फुटीरतावादी संघटनेने प्रथमच आपल्या महिला ब्रिगेडचा व्हिडिओ प्रसिद्ध केला. शायनाझ बलुच असे या महिला कमांडरचे नाव आहे. या व्हिडिओत तिने बलुचिस्तानच्या लोकांना संघटनेच्या चळवळीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

बीएलएच्या प्रचार शाखेने जारी केलेल्या सुमारे ११ मिनिटांच्या या व्हिडिओमध्ये शायनाझने माध्यमे आणि स्थानिक नागरिकांना संबोधित केले. तिने दावा केला की, बलुच महिलाही आता केवळ घरापुरत्या मर्यादित न राहता चळवळीत सक्रिय सहभाग घेत आहेत. संघटनेने तिला पहिली महिला कमांडर किंवा स्वातंत्र्यसैनिक बनवले आहे. दरम्यान, बलुचिस्तानमध्ये गेल्या काही महिन्यांपासून हिंसक कारवायांमध्ये वाढ झाली आहे. बीएलएने पाकिस्तानच्या विमानतळ सुरक्षा दलातील (एएसएफ) एका वरिष्ठ अधिकाऱ्याला ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार हमजाच्या अंत्ययात्रेत शस्त्रधारी दहशतवादी

### व्हिडिओ व्हायरल

■ इस्लामाबाद

**२०१९ मधील** पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार हमजा बुरहान याचा पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये गोळ्या झाडून हत्या झाली. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार झाले. या अंत्यविधीला अनेक कुख्यात दहशतवादी आणि पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयचे अधिकारी उपस्थित होते, असा दावा व्हायरल व्हिडिओंच्या आधारे स्थानिक वृत्तांमध्ये झाला आहे. हमजा बुरहान हा अर्जुमंद गुलजार दार आणि डॉक्टर या नावांनीही ओळखला जात होता. तो गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये राहत होता. स्थानिक माहितीनुसार, तो एका खासगी महाविद्यालयात शिक्षक म्हणून काम करत होता आणि मुझफ्फराबादमधील एका कॉलेजचा प्राचार्यही होता. व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये अंत्ययात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणावर सशस्त्र लोक दिसत आहेत.

# ब्रिटनमध्ये ड्रग तस्करी करणाऱ्या भारतीय वंशाच्या आरोपीला शिक्षा

■ लंडन

**मेट्रोपॉलिटन** पोलिसांनी ब्रिटनमध्ये मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीविरोधात कारवाई करत पाच जणांना एकूण ८४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावल्याची माहिती आहे. या प्रकरणात भारतीय वंशाच्या जगजीत सिंगलाही दोषी ठरवले असून, त्याला १० वर्षे आणि सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. बर्मिंगहॅममध्ये राहणारा ३० वर्षीय जगजीत सिंग हा लंडन आणि आसपासच्या भागात कोकेन आणि हेरॉईनसारख्या अमली पदार्थांच्या तस्करीत सक्रिय होता. तपासादरम्यान पोलिसांनी ३०० किलोहून अधिक कोकेन आणि ६० किलोपेक्षा जास्त हेरॉईन जप्त केले.

# आजचे राशी भविष्य



सोमवार ता. २५ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | सावध दृष्टीकोन हिताचा ठरेल. प्रियजनांशी बोलताना बोलण्यावर ताबा ठेवा. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकणे योग्य राहील. |
| वृषभ | बोलण्यापूर्वी विचार करा. वाद होण्याची शक्यता. किरकोळ गोष्टी गांभिर्याने घेऊ नका. |
| मिथुन | उत्साहवर्धक दिवस. मित्र आणि सहकाऱ्यांचे पाठबळ लाभेल. पारितोषिकप्राप्तीचे योग. |
| कर्क | तणावाचे सावट राहील. असहकार्याचा सामना करावा लागेल. सहकाऱ्यांशी गोडीगुलाबीने वागणे फायद्याचे ठरेल. |
| सिंह | अनावश्यक वादविवादाची शक्यता. वागण्याबोलण्यात सौम्यपणा हितावह ठरेल. वायफळ खर्च चिंता वाढवेल. |
| कन्या | खिलाडू वृत्ती उपयोगी ठरेल. कामे मार्गी लावताना अडथळे येतील. संयम ठेवा. |
| तूळ | अर्थप्राप्तीत वाढ होईल. नोकरी मिळण्याची जोरदार संधी आहे. स्वप्रयत्नाने प्रगती साधता येईल. |
| वृश्चिक | आज नशिबाची साथ लाभेल. वडिलधाऱ्यांचा पाठिंबा मिळेल. एकंदरीत दिवस समाधानकारक राहील. |
| धनु | कीर्तन-प्रवचन, जपतप अशा गोष्टी दिलासा देतील. बोलण्यावर ताबा ठेवा. मित्रांच्या गाठीभेटी टाळणे हिताचे ठरेल. |
| मकर | मन चिंतातुर राहील. तणावाखाली कोणाच्या डिवचण्याला बळी पडू नका. शांतचित्ताने दिवस व्यतीत करा. |
| कुंभ | लोकसंपर्कासाठी चांगला दिवस. नवीन मित्र जोडले जातील. सभासमारंभात भाग घ्याल. |
| मीन | सुदैवी दिवस. मेहनत फळाला येईल. आर्थिक प्रगतीचा आलेख उंचावेल. गुंतवणूक करण्यास अनुकूलता. |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 24/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MO-06 : 6813**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0122 | 0682 | 0733 | 0971 | 2274 (पवार लॉटरी, ठाणे) | 2373 (महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर) | 6149 | 6738 | 7426 | 8779 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0729 | 1282 | 3173 | 5034 | 5214 | 5732 | 5780 | 7184 | 7393 | 8981 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0088 | 1105 | 1317 | 2188 | 2677 | 3788 | 4324 | 8555 | 9139 | 9890 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1182 | 2578 | 4167 | 5283 | 6237 | 7074 | 8018 | 8903 |
| | 1259 | 2633 | 4432 | 5435 | 6302 | 7114 | 8073 | 8963 |
| 0063 | 1300 | 2694 | 4634 | 5511 | 6357 | 7212 | 8117 | 9180 |
| 0088 | 1351 | 2715 | 4706 | 5553 | 6363 | 7237 | 8126 | 9245 |
| 0306 | 1370 | 2723 | 4769 | 5586 | 6366 | 7273 | 8385 | 9499 |
| 0360 | 1719 | 2811 | 4804 | 5598 | 6378 | 7587 | 8576 | 9521 |
| 0571 | 1873 | 3103 | 4844 | 5668 | 6401 | 7738 | 8578 | 9524 |
| 0618 | 1875 | 3237 | 5048 | 5955 | 6466 | 7746 | 8638 | 9614 |
| 0662 | 1919 | 3485 | 5056 | 6019 | 6513 | 7770 | 8696 | 9623 |
| 0903 | 2032 | 3785 | 5140 | 6038 | 6627 | 7772 | 8857 | 9723 |
| 0984 | 2244 | 3934 | 5195 | 6114 | 6660 | 7852 | 8872 | 9944 |
| 1007 | 2262 | 4076 | 5199 | 6161 | 6668 | 7915 | 8884 | 9984 |
| 1158 | 2382 | 4095 | 5251 | 6187 | 6673 | 7927 | 8894 | 9987 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 24/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-06 : 4784**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 7760

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 5539

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2481 | 2770 | 3455 | 4001 | 4058 | 5776 | 6735 | 7035 | 7186 | 8473 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0156 | 0486 | 0799 | 1269 | 2623 | 6202 | 6267 | 6450 | 7166 | 9791 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 4396 | 5496 | 6389 | 7251 | 7266 | 7344 | 8126 | 8390 | 8753 | 9229 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1292 | 2248 | 3475 | 4469 | 5552 | 6649 | 7703 | 8290 | 9030 |
| | | 1354 | 2297 | 3481 | 4479 | 5580 | 6698 | 7707 | 8297 | 9033 |
| | | 1413 | 2396 | 3539 | 4480 | 5601 | 6734 | 7721 | 8320 | 9090 |
| 0016 | 0666 | 1418 | 2632 | 3545 | 4543 | 5675 | 6836 | 7747 | 8328 | 9149 |
| 0022 | 0668 | 1471 | 2715 | 3564 | 4558 | 5894 | 6841 | 7762 | 8388 | 9174 |
| 0030 | 0720 | 1514 | 2725 | 3583 | 4698 | 5999 | 6943 | 7798 | 8428 | 9243 |
| 0050 | 0784 | 1515 | 2803 | 3618 | 4844 | 6003 | 6962 | 7806 | 8484 | 9299 |
| 0069 | 0872 | 1610 | 2849 | 3713 | 4971 | 6061 | 7015 | 7854 | 8550 | 9335 |
| 0074 | 0888 | 1670 | 2929 | 3718 | 4978 | 6143 | 7030 | 7873 | 8554 | 9392 |
| 0077 | 0895 | 1729 | 2962 | 3721 | 5042 | 6167 | 7086 | 7906 | 8593 | 9443 |
| 0090 | 0921 | 1771 | 2972 | 3839 | 5118 | 6176 | 7141 | 7936 | 8692 | 9479 |
| 0103 | 1011 | 1971 | 3023 | 3863 | 5183 | 6258 | 7179 | 7979 | 8728 | 9500 |
| 0119 | 1015 | 2060 | 3032 | 3876 | 5259 | 6266 | 7271 | 8101 | 8775 | 9583 |
| 0150 | 1019 | 2110 | 3139 | 3933 | 5285 | 6368 | 7293 | 8107 | 8822 | 9599 |
| 0306 | 1045 | 2112 | 3311 | 4064 | 5350 | 6371 | 7308 | 8180 | 8846 | 9749 |
| 0310 | 1120 | 2117 | 3331 | 4148 | 5354 | 6380 | 7417 | 8188 | 8859 | 9849 |
| 0390 | 1185 | 2121 | 3340 | 4160 | 5361 | 6392 | 7487 | 8195 | 8867 | 9900 |
| 0468 | 1222 | 2154 | 3348 | 4194 | 5401 | 6456 | 7497 | 8200 | 8909 | 9914 |
| 0494 | 1228 | 2175 | 3356 | 4240 | 5465 | 6536 | 7532 | 8209 | 8922 | 9939 |
| 0509 | 1240 | 2213 | 3443 | 4401 | 5514 | 6566 | 7541 | 8248 | 8979 | 9967 |
| 0664 | 1285 | 2218 | 3452 | 4447 | 5550 | 6568 | 7569 | 8279 | 9013 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. २५/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ० | ३ | ८ |
| ०४ | ३१ | ८१ |
| ०९ | ३६ | ८६ |
| १४५ | १३९ | १८९ |
| २८० | २४७ | २६० |

# मोटार अपघातात तीन गायक जखमी

■ मुंबई

**कार्यक्रम** आटोपून घरी परतणाऱ्या गायकांच्या गाडीला अपघात होऊन गणेश शिंदे, सन्मिता शिंदे आणि प्रतीक्षा हे जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गाडीतील एअरबॅग वेळेत उघडल्याने मोठा अनर्थ टळला.

अपघातात गायक गणेश शिंदे यांच्या छातीला गंभीर दुखापत झाली आहे. तर गायिका सन्मिता शिंदे आणि प्रतीक्षा यांच्या पायाला दुखापत झाली असून, दोघींवर शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. गणेश शिंदे, सन्मिता शिंदे आणि प्रतीक्षा यांचा समाजमाध्यमांवर मोठा चाहता वर्ग आहे. 'मोगरा फुलला' आणि 'ज्ञानियांचा राजा' यांसारख्या संगीतमय कार्यक्रमांमुळे ते लोकप्रिय आहेत. गणेश शिंदे हे महाराष्ट्रातील प्रेरणादायी वक्ते आणि गायक म्हणून ओळखले जातात. ते सुप्रसिद्ध गायिका सन्मिता धापटे-शिंदे यांच्यासोबत अनेक संगीत मैफिली आणि भक्तिगीतांचे कार्यक्रम सादर करतात. सन्मिता धापटे-शिंदे यांनी २०२१ मध्ये 'सूर नवा ध्यास नवा' या कार्यक्रमाचे विजेतेपद पटकावले होते.

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 24/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-03 : 6076** — सुमित एजन्सी - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0786 | 2323 | 3387 | 4452 | 4889 | 6451 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 6886 | 7267 | 7664 | 8976 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0546 | 1058 | 1513 | 1541 | 1749 | 2715 | 3392 | 3626 | 6811 | 8401 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0167 | 4421 | 5265 | 5486 | 5583 | 6095 | 7647 | 7966 | 9394 | 9799 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1143 | 1830 | 2324 | 3071 | 3384 | 4440 | 4483 | 7273 | 9517 | 9691 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1339 | 2238 | 3206 | 4046 | 5062 | 5988 | 6924 | 7779 | 8428 | 9290 |
| | | 1425 | 2242 | 3248 | 4081 | 5080 | 6017 | 6943 | 7805 | 8480 | 9293 |
| 0000 | 0680 | 1481 | 2245 | 3257 | 4113 | 5143 | 6026 | 6951 | 7871 | 8502 | 9312 |
| 0060 | 0768 | 1485 | 2282 | 3271 | 4198 | 5170 | 6062 | 7032 | 7887 | 8544 | 9361 |
| 0072 | 0798 | 1503 | 2291 | 3340 | 4325 | 5205 | 6136 | 7034 | 7898 | 8554 | 9394 |
| 0090 | 0802 | 1589 | 2310 | 3341 | 4347 | 5266 | 6160 | 7127 | 7908 | 8568 | 9401 |
| 0098 | 0865 | 1669 | 2312 | 3343 | 4394 | 5398 | 6176 | 7167 | 7925 | 8581 | 9476 |
| 0142 | 1108 | 1678 | 2321 | 3349 | 4474 | 5402 | 6217 | 7309 | 8050 | 8781 | 9477 |
| 0158 | 1110 | 1737 | 2482 | 3354 | 4513 | 5429 | 6330 | 7317 | 8068 | 8791 | 9553 |
| 0195 | 1122 | 1785 | 2624 | 3355 | 4532 | 5435 | 6377 | 7326 | 8082 | 8804 | 9559 |
| 0234 | 1135 | 1869 | 2629 | 3379 | 4537 | 5445 | 6516 | 7359 | 8087 | 8815 | 9590 |
| 0285 | 1137 | 1893 | 2706 | 3387 | 4546 | 5492 | 6535 | 7371 | 8102 | 8842 | 9593 |
| 0291 | 1162 | 1988 | 2767 | 3397 | 4569 | 5548 | 6564 | 7417 | 8145 | 8846 | 9598 |
| 0330 | 1165 | 1995 | 2782 | 3526 | 4596 | 5556 | 6638 | 7457 | 8202 | 8849 | 9606 |
| 0372 | 1167 | 2022 | 2789 | 3632 | 4612 | 5597 | 6675 | 7494 | 8247 | 8879 | 9694 |
| 0403 | 1179 | 2052 | 2813 | 3650 | 4652 | 5602 | 6680 | 7544 | 8259 | 8888 | 9698 |
| 0409 | 1242 | 2074 | 2823 | 3702 | 4676 | 5692 | 6721 | 7587 | 8261 | 8997 | 9699 |
| 0474 | 1291 | 2113 | 2872 | 3757 | 4745 | 5753 | 6734 | 7663 | 8279 | 9099 | 9897 |
| 0508 | 1297 | 2138 | 2902 | 3813 | 4826 | 5777 | 6772 | 7672 | 8283 | 9186 | 9948 |
| 0566 | 1319 | 2149 | 2971 | 3864 | 4834 | 5858 | 6813 | 7721 | 8293 | 9196 | 9968 |
| 0653 | 1320 | 2224 | 2996 | 3967 | 4945 | 5958 | 6848 | 7727 | 8323 | 9236 | 9988 |
| 0654 | 1321 | 2235 | 3037 | 4021 | 5055 | 5971 | 6915 | 7732 | 8386 | 9277 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

# २२५ दिवसांनी हेमकुंड साहिबचे दरवाजे भाविकांसाठी उघडले

■ चमोली



**उत्तराखंडमधील** शिखांचे पवित्र तीर्थस्थान असलेल्या श्री हेमकुंड साहिबचे दरवाजे पूर्ण धार्मिक विधींनंतर भाविकांसाठी खुले करण्यात आले. तब्बल २२५ दिवसांनंतर कपाट उघडल्याने देश-विदेशातून आलेल्या भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी तीन हजारांहून अधिक भाविक हेमकुंड साहिब येथे उपस्थित होते. पंच प्याऱ्यांच्या नेतृत्वाखाली भाविकांचा पहिला जत्था घांघरिया येथून कठीण चढाई पूर्ण करून सुमारे १५०० फूट उंचीवरील धाममध्ये दाखल झाला. गुरुद्वाराला सुमारे पाच क्विंटल फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. कपाट उघडण्यापूर्वी धार्मिक परंपरेनुसार सचखंडहून गुरुग्रंथ साहिब यांना दरबार साहिबमध्ये विराजमान करण्यात आले. मागील वर्षी हेमकुंड साहिबचे दरवाजे १० ऑक्टोबर रोजी हिवाळ्यासाठी बंद करण्यात आले होते. त्यानंतर सहा महिन्यांहून अधिक काळ हे पवित्र स्थळ बर्फाच्छादित होते. यंदाच्या यात्रेसाठी आतापर्यंत ६७ हजार ६९० भाविकांनी ऑनलाईन आणि प्रत्यक्ष नोंदणी केली आहे.

# वकिलाचा मोटारीच्या धडकेत मृत्यू

### हत्या असल्याचा मुलाचा संशय

■ हैदराबाद

**हैदराबादमध्ये** ज्येष्ठ वकील खाजा मोईजुद्दीन यांचा एका एसयूव्ही वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. हा प्रकार हत्या असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, अशी माहिती पोलिसांनी काल दिली. मोईजुद्दीन यांचा मुलगा म्हणाला की, माझे वडील काही व्यक्तींविरोधात वक्फ मालमत्तांवरील अतिक्रमण आणि जमीन बळकावण्याच्या प्रकरणांवर लढा देत होते. याच कारणातून त्यांची हत्या घडवून आली असावी. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६३ वर्षीय खाजा मोईजुद्दीन हे हैदराबादमधील मसाब टँक परिसरातील त्यांच्या निवासस्थानाबाहेर कारमध्ये बसण्याच्या तयारीत असताना नंबर प्लेट नसलेल्या एसयूव्हीने त्यांना जोरदार धडक दिली. या घटनेनंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडून भावी नवरदेवाचा दुर्दैवी मृत्यू

**जळगाव** - यावल तालुक्यातील दहिगाव येथे रोटावेटरचे काम करत असताना ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडून २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. मृत तरुणाचे नाव योगेश यशवंत पाटील (२८) असे असून, तो दहीगावचा रहिवासी होता. त्याचे पुढील महिन्यात लग्न होणार होते. मृत योगेश पाटील हा शेतीकामासाठी ट्रॅक्टरद्वारे रोटावेटरचे काम करत होता. बबलू उर्फ शोभराज रमेश महाजन यांच्या मोहराळे शेतात तो काम करत असताना अचानक त्याचा तोल गेला. यावेळी तो थेट ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली सापडला व रोटावेटरमध्ये अडकून तो रक्तबंबाळ झाला. गंभीर अवस्थेतील योगेशला यावल येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

# तारकर्ली समुद्रात बेपत्ता तरुणाचा मृतदेह दांडी किनाऱ्यावर सापडला

**नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन**

मालवण

**तारकर्ली** येथील समुद्रात गुरुवारी सायंकाळी समुद्रस्नान करताना बुडून बेपत्ता झालेल्या समर्थ गणेश कर्पे (२२) या पर्यटक तरुणाचा मृतदेह काल मालवण-दांडी येथील पद्मगडजवळील किनाऱ्यावर आढळून आला. मालवण पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनानंतर तो नातेवाईकांच्या स्वाधीन केला.

दोन दिवसांपूर्वी तारकर्ली येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या निवास केंद्रासमोरील समुद्रात समर्थ कर्पे आणि ऋषभ रविकिरण कदम (२७) हे दोघे समुद्रस्नान करत होते. त्यावेळी समुद्राच्या प्रचंड लाटांमुळे दोघेही समुद्रात ओढले गेले. ऋषभ कदम याने कसाबसा किनारा गाठल्याने स्थानिकांनी त्याला समुद्राबाहेर काढून जीव वाचवला. मात्र समर्थ कर्पे हा समुद्रात बेपत्ता झाला होता. घटनेनंतर गेले दोन दिवस स्थानिक मच्छीमार, पर्यटन व्यावसायिक आणि मालवण पोलीस यांच्याकडून समुद्रात समर्थ याचा शोध घेण्यात येत होता. पोलिसांनी किनारपट्टीवरील नागरिकांनाही सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. तसेच मत्स्य विभागाच्या सहाय्याने ड्रोन कॅमेऱ्याद्वारे समुद्रात शोधमोहीम राबविण्यात आली होती. समर्थ याचा शोध लागत नव्हता.

# वसई-विरारमध्ये ३३ दरडप्रवण क्षेत्र घोषित

वसई

**वसई-विरार** महापालिकेने शहरातील ३३ अतिसंवेदनशील आणि दरड प्रवण क्षेत्र घोषित केली आहेत.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे डोंगर भागातील माती पोकळ होऊन भूस्खलन होणे, दरड कोसळणे अशा घटना घडत असतात. अनेकदा दरड कोसळून जीवितहानी व वित्तहानी होत असते. महापालिकेने शहरातील डोंगर माथ्याचे परिसर व डोंगराला लागून असलेल्या भागांचे सर्वेक्षण केले आहे. यात शहरात ३३ ठिकाणे भूस्खलन व दरड प्रवण क्षेत्र घोषित केले आहेत. यात सर्वाधिक धोका प्रभाग समिती 'एफ' (धानिव-पेल्हार) आणि प्रभाग समिती 'जी' (वालीव) या भागात असल्याचे समोर आले आहे. या ठिकाणी जनजागृती करणे, त्या भागात राहणाऱ्या नागरिकांची भेट घेऊन त्यांना विशेष सूचना देणे, सूचना फलक लावणे, आवश्यक ठिकाणी जाळ्या लावणे अशी कामे हाती घेतली असल्याचे अतिरिक्त आयुक्त दीपक सावंत यांनी सांगितले.

# पंढरीत भाविकांची मोठी गर्दी दर्शनासाठी ४ किमी लांब रांगा



पंढरपूर

**अधिक** मासात पंढरपूरमध्ये विठ्ठल दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली आहे. आज विठ्ठल मंदिरापासून जवळपास चार किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या असल्याचे चित्र पाहायला मिळत होते. मे महिन्यातील शेवटचा आठवडा आणि अधिक मासानिमित्त पंढरपुरात भाविकांची मोठी गर्दी झालेली पाहायला मिळत आहे.

आज विठ्ठलाची दर्शन रांग चार किलोमीटर लांब गोपाळपूर रोडपर्यंत जाऊन पोहोचली होती. अधिक मासात विठ्ठल दर्शन घेणे हे भाविकांसाठी एक पर्वणी समजली जाते. गेल्या काही दिवसांपासून गोपाळपूर रोडचे सर्व पत्रा शेड हे विठ्ठल भक्तांनी फुलून जात आहेत. दर्शनासाठी किमान आठ ते दहा तासांचा कालावधी लागत आहे. अशातच उन्हाचा पारा वाढत असताना भाविकांसाठी कुलर देखील दर्शन रांगेत लावण्यात आले आहेत. त्यामुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विठ्ठलभक्त वारकऱ्यांना दर्शन रांगेत थंड पाणी व कुलरच्या थंडाव्यामुळे विठ्ठलाच्या भक्तीचा मार्ग सुखकर होत आहे. विठ्ठल दर्शनासाठी भाविक यावेळी आतूर दिसत आहेत. पुरुषोत्तम अधिक मासामुळे भाविक मोठ्या संख्येने पंढरपूरमध्ये आले आहेत.

# वाशिमचे उबाठाचे जिल्हाप्रमुख मापारींसह ८ नगरसेवक भाजपात

वाशिम

**उबाठाचे** वाशिमचे जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांनी पक्षाला रामराम ठोकत आज भाजपात प्रवेश केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेला हा प्रवेश उबाठासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

मापारी यांच्यासोबत उबाठाचे आठ नगरसेवक तसेच काही सरपंचांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. मुंबईतील भाजपाच्या प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. सुरेश मापारी यांचे उबाठाचे स्थानिक खासदार संजय देशमुख यांच्याशी काही काळापासून मतभेद होते. त्यांनी अनेकदा देशमुख यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली होती. पक्षश्रेष्ठींकडेही त्यांनी याबाबत तक्रारी केल्या होत्या. मात्र त्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

# जळगाव विधान परिषदेची जागा शिंदे गटाला द्या

**गुलाबराव पाटलांची मुलासाठी मागणी**



जळगाव

**जळगाव** विधान परिषदेच्या जागेबाबत शिंदे गटाचे नेते व मंत्री गुलाबराव पाटील यांनी पक्षासाठी दावा करत आपल्या मुलासाठी उमेदवारीची मागणी केली आहे. प्रताप पाटील आणि सुमित हे दोघे इच्छुक असले तरी सुमितचे वय कमी असल्याने प्रताप पाटील यांना उमेदवारी द्यावी, असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे.

गुलाबराव पाटील म्हणाले की, जळगाव विधान परिषदेची जागा शिवसेनेला मिळावी अशी मागणी आम्ही केली आहे. मात्र यावर निर्णय हा वरच्या स्तरावर होणार आहे. महायुतीचे नेते जो निर्णय घेतील तो निर्णय मान्य असेल. विधान परिषदेच्या ७ जागा आम्हाला मिळाव्यात, अशी मागणी आम्ही केली आहे.

आता ज्येष्ठ नेते काय निर्णय घेतात ते पाहावे लागेल. योग्य निर्णय होईल. जळगावच्या जागेबद्दल अजून निर्णय झालेला नाही. आमच्या पक्षाला जागा सुटली तरी आम्हाला भाजपाची गरज आहे आणि जागा भाजपाला सुटली तरी भाजपाला आमची गरज आहे. त्यामुळे उमेदवार देतानासुद्धा वरिष्ठ नेत्यांच्या सुचनेनुसार उमेदवार देऊ. महायुतीचा उमेदवार कसा विजयी होईल यासाठी आम्ही प्रयत्न करू. शेवटी जर नशिबात असेल तरच पद मिळत असते. जागा मिळावी ही मागणी आम्ही केलेली आहे. महायुती सर्वात मोठी म्हणून आम्ही काम करत असतो. आम्ही अर्ज भरू. पण महायुतीचे नेते जे ठरवतील तोच निर्णय अंतिम राहील.

# पश्चिम बंगालमधील फालतामध्ये भाजपा उमेदवार देबांग्शु विजयी

कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील फेरमतदान घेण्यात आलेल्या फालता जागेवर भाजपा उमेदवार देबांग्शु यांनी १ लाखांहून अधिक मतांच्या फरकाने विजय मिळवला. त्यांना १.४९ लाखांहून अधिक मते मिळाली. सीपीएमचे उमेदवार शंभूनाथ कुर्मी ४० हजार मतांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिले. तर निवडणुकीतून माघार घेणारे तृणमूलचे जहांगीर चौथ्या क्रमांकावर आहेत.

फालता येथील २८५ मतदान केंद्रांवर २१ मे रोजी पुन्हा मतदान घेण्यात आले होते. फालतामध्ये तृणमूल आणि भाजपा यांच्यात लढत होती. या जागेसाठी सहा उमेदवार रिंगणात होते. परंतु तृणमूल काँग्रेसचे उमेदवार जहांगीर खान यांनी फेरमतदानाच्या काही दिवसांपूर्वीच घोषणा केली होती की, ते निवडणूक लढवणार नाहीत. त्यांनी ही बाब निवडणूक आयोगाला लेखी स्वरूपात न कळवल्याने फेरमतदानाच्या वेळी ईव्हीएममध्ये त्यांचे नाव आणि चिन्ह होते. फालता विधानसभा मतदारसंघात भाजपाने पहिल्यांदा विजय मिळवला आहे.

# साताऱ्यात २ शेतकऱ्यांचा वीज अंगावर कोसळून मृत्यू

सातारा

**जिल्ह्यातील** काही भागांत काल विजांच्या कडकडाटासह वळवाचा पाऊस झाला. यावेळी माण तालुक्यातील वाघमोडेवाडी व कोरेगाव तालुक्यातील रामोशीवाडी येथे वीज अंगावर कोसळून दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर चौघेजण भाजले.

माण तालुक्यातील वाघमोडेवाडी येथे आनंदराव कोकरे यांच्या शिखर खडी शेतातील बोअरवेलमधील मोटर काढण्यासाठी पिंगळी बुद्रुक येथील शंकर रामचंद्र वाघमोडे (४२) हे अन्य चौघांसह तिथे गेले होते. त्यावेळी अचानक जोरदार वादळी वारे व पावसाला सुरुवात झाल्याने सर्वजण ट्रॅक्टरच्या आडोशाला



थांबले होते. त्याचवेळी अचानक विजेचा जोरदार कडकडाट होऊन विजेचा लोळ शंकर वाघमोडे यांच्या अंगावर कोसळला. त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत अन्य चौघेही भाजले असून, दहिवडी ग्रामीण रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

तसेच कोरेगाव तालुक्यातील रामोशीवाडीच्या घोडमुख शिवारात दुपारी शेतकरी दादा चिलबा बुधावले (५२) यांचा हे बकरी चारण्यासाठी गेले होते. त्यावेळी अचानक जोरदार वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरू झाला. बकरी काही अंतरावर सोडून पावसापासून बचाव करण्यासाठी बुधावले बाजूला थांबले असता अचानक त्यांच्या अंगावर वीज कोसळली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# वाशिममध्ये डिझेलने भरलेला टँकर उलटला

वाशिम

**वाशिमच्या** कारंजा-मूर्तीझापूर रोडवरील तक्षशिला महाविद्यालयाजवळ डिझेलने भरलेला टँकर पलटला. वर्धा जिल्ह्याच्या दिशेने जात असलेला हा टँकर अचानक अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला उलटला. अपघातानंतर टँकरमधून मोठ्या प्रमाणावर डिझेल गळती सुरू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या अपघातात टँकर चालक केबिनखाली अडकून गंभीर जखमी झाला होता. डिझेलची गळती सुरू असल्यामुळे स्फोटाचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे घटनास्थळी उपस्थित नागरिकांमध्ये भीती पसरली होती. त्यानंतर पोलिसांनी क्रेन पाचारण केली आणि बचावकार्य सुरू केले. तब्बल ४५ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर पोलिसांनी केबिनखाली अडकलेल्या चालकाला सुरक्षित बाहेर काढले.

# सेंट्रल मार्डची नवी कार्यकारिणी डॉ. अथर्व शिंदेंची अध्यक्षपदी निवड

मुंबई

**महाराष्ट्र** राज्य निवासी डॉक्टर संघटना अर्थात महाराष्ट्र स्टेट असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड) ने २०२६-२७ या कालावधीसाठी नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा केली आहे. १५ मे २०२६ पासून एका वर्षासाठी ही कार्यकारिणी कार्यरत राहणार आहे. महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न संस्थांमधील निवासी डॉक्टरांचे प्रतिनिधित्व या नव्या समितीत करण्यात आले आहे. २०२६-२७ या कार्यकाळासाठी ठाण्यातील आरजीएमसीचे डॉ. अथर्व शिंदे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयाचे डॉ. सचिन पालवडे यांची सरचिटणीसपदी निवड झाली आहे.

राज्यातील निवासी डॉक्टरांशी संबंधित शैक्षणिक, व्यावसायिक आणि कल्याणकारी उपक्रम अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ही कार्यकारिणी स्थापन करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सरकारी यंत्रणा, संस्थात्मक प्रशासन आणि इतर संबंधित घटकांशी समन्वय साधून आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि निवासी डॉक्टरांच्या कल्याणासाठी काम केले जाणार आहे.


# हॉटेल 'होरायझन'चा प्रत्यक्ष ताबा सोपवण्यासाठी बळाचा वापर करा

**हायकोर्टाचे जुहू पोलिसांना आदेश**

मुंबई

**जुहू** येथील 'हॉटेल होरायझन' या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दिवाळखोर निवारण प्रक्रियेतील यशस्वी अर्जदाराकडे सोपवण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करा, प्रसंगी बाळाचा वापर करून ताबा सोपवण्याची प्रक्रिया पूर्णत्वास न्या, असे आदेश उच्च न्यायालयाने जुहू पोलिसांना नुकतेच दिले.

न्यायमूर्ती मनीष पितळे आणि न्यायमूर्ती श्रीराम शिरसाठ यांच्या खंडपीठाने सविस्तर सुनावणीनंतर हे आदेश दिले. हॉटेलचा ताबा देण्याच्या प्रक्रियेत अडसर येत असल्याचा दावा करीत प्रवठण आर. नवंदर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती मनीष पितळे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. निलंबित संचालकांनी मालमत्तेच्या वर्णनाबाबत वाद निर्माण करून दिवाळखोरी निवारण प्रक्रियेला उशीर करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. हॉटेलच्या मालमत्तेचे काही भाग कंपनीचे नसून वैयक्तिक मालकीचे असल्याचा दावा संचालकांनी केला होता. मात्र, याच संचालकांनी यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात ही संपूर्ण मालमत्ता कंपनीची असल्याचे मान्य केले होते. हा विरोधाभास न्यायमूर्ती पितळे यांच्या खंडपीठाने गांभीर्याने विचारात घेतला आणि दिवाळखोर निवारण प्रक्रियेतील यशस्वी अर्जदाराकडे हॉटेलचा ताबा सोपवण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करण्यास मुभा दिली. न्यायालयाने निलंबित संचालकांच्या सततच्या अडवणुकीच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.




# डिझेल दरवाढीमुळे शेतकरी पुन्हा बैलजोडीकडे वळू लागले

तासगाव

**डिझेलचे** वाढलेले दर आणि ग्रामीण भागातील इंधन टंचाईमुळे ट्रॅक्टर, पॉवर टिलरच्या सहाय्याने शेतीची मशागत करणे शेतकऱ्यांना परवडेनासे झाले आहे. त्यामुळे उत्पादन खर्च आटोक्यात आणण्यासाठी शेतकरी पुन्हा एकदा पारंपरिक आणि स्वदेशी असलेल्या बैलजोडीच्या मदतीने शेतीची कामे पूर्ण करण्याकडे वळत आहेत.

पूर्वी बैलजोडी आणि पशूधन मुबलक प्रमाणात असायचे. मात्र काळाच्या ओघात यांत्रिकीकरण वाढले. चाऱ्याची कमतरता निर्माण झाली आणि बैलजोडी सांभाळणे परवडेनासे झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी पशुधनाकडे पाठ फिरवली. परिणामी आज गावागावात बैलजोडी दुर्मीळ झाली आहे. आता मात्र इंधन टंचाई आणि वाढत्या डिझेल दरामुळे पुन्हा पारंपरिक शेती पद्धतीची आठवण शेतकऱ्यांना होऊ लागली आहे. अनेक गावांमध्ये बैलजोडी असलेल्या शेतकऱ्यांची मनधरणी करून नांगरणीसाठी बैल मागण्याची वेळ आली आहे. ट्रॅक्टरपेक्षा बैलजोडी परवडणारी असल्याची चर्चा ग्रामीण भागात रंगू लागली आहे.









संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# गुन्हेगारी जिवंत ठेवणारी शस्त्रतस्करी

**राज्याची** कायदा सुव्यवस्था उत्तम आहे असे सरकारला किंवा पोलिसांना कितीही वाटत असले तरी कायद्याचा प्रभाव अनेक ठिकाणी कमी पडतो. आणि त्यातूनच व्यवस्थेलाही गालबोट लागते. गेल्या काही दिवसांत पुणे, नागपूर, नाशिक या ठिकाणी स्थानिक स्तरावरची गुंडगिरी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले. पुणे, नागपूरमध्ये तर महिना पंधरा दिवसांच्या अंतराने कोयता गँग, तलवार गँग यांचा धुमाकूळ सुरूच असतो. मराठवाड्यात तर बीड, लातूर हे जिल्हे गुन्हेगारीला आंदण दिल्यासारखीच परिस्थिती असते. क्षुल्लक वादातल्या खून हत्यांपासून ते राजकीय वैमनस्याचे हिशोब पूर्ण करण्यासाठी केला जाणारा हिंसाचार पूर्णपणे थांबू शकलेला नाही. मुंबईसारख्या महानगरात अतिशय छुप्या पद्धतीने बेकायदेशीर व्यवहार होत राहतात. या अवैध धंद्यांना संरक्षण मिळावे म्हणून गुंडांच्या टोळ्या छुप्या पद्धतीनेच काम करीत राहतात. आजही मुंबईत खंडणी वसुलीचे काम काही विशिष्ट टोळ्यांकडून सुरू असते तर अनेक बिल्डर्स, राजकीय नेतेसुद्धा धाकधपटशा दाखवून अनेक प्रकारची कामे करून घेतात. ज्यावेळेला जवळपास राज्याच्या सर्वच भागात ही गुन्हेगारी पाहायला मिळते. ही गुन्हेगारी जिवंत ठेवण्याचे काम अनेक घटक करत असतात. मग स्थानिक राजकीय नेत्यांपासून ते पोलिसांचेही छुपे हितसंबंध ही गुन्हेगारी चालू ठेवतात. यातला आणखी एक गंभीर भाग म्हणजे इतक्या खुलेआमपणे जेव्हा तलवार गँग किंवा कोयता गँग धुमाकूळ घालते त्यावेळेला त्यांना अतिशय सहजपणे आणि स्वस्त दरात शस्त्रपुरवठाही होत राहतो. आणि सध्या महाराष्ट्रामध्ये अशा अवैध शस्त्रतस्करीचे छुपे धंदे खुलेआमपणे सुरू आहेत असे म्हणावे लागेल. गेल्या दोन दिवसात नांदेड, नाशिक आणि मुंबईत सापडलेले शस्त्रसाठे हे याच कायदा सुव्यवस्थेला आव्हान देणारे ठरतात. आणि गुन्हेगारीलाही जिवंत ठेवतात. महाराष्ट्रासारख्या राज्यात जरी शस्त्रतस्करी वाढत असेल तर राज्याच्या सुरक्षिततेपुढचे ते आव्हान आहेच. परंतु कायदा सुव्यवस्थेला धाब्यावर बसवणारेसुद्धा म्हणावे लागते.

### छुपे संरक्षण आणि प्रोत्साहन

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी मानली जातेच. परंतु इथे जागेला प्रचंड किंमत आहे आणि अवैध धंद्यांचे प्रमाणही बऱ्यापैकी सुरू राहण्यासाठी गुंड टोळ्यांना हाताशी धरण्याचा प्रकार पाहायला मिळतो. आणि अतिशय छुप्या पद्धतीने खंडणी वसुलीचे कामही चालू राहते. या गुंड टोळ्यांना शस्त्र पुरवणाऱ्या टोळ्यादेखील तितक्याच सक्रिय असतात. पायधुनी भागात जेजे हॉस्पिटलजवळ पकडला गेलेला तीन पिस्तुल आणि पंचेचाळीस काडतुसांचा साठा हे त्याचेच निदर्शक ठरते. सगळी पिस्तुलं चिनी बनावटीची आहेत. तस्करी करून आणलेली ही पिस्तुलं नेमकी कोणाला दिली जाणार होती, याचा खुलासा अद्याप झालेला नाही. परंतु 'जशी मागणी तसा पुरवठा' या तत्त्वाप्रमाणेच तस्करी केलेली ही शस्त्र संबंधितांपर्यंत पोहोचत असतात. गेल्या वर्ष-दोन वर्षांत मुंबईत बिष्णोई टोळीने आपली दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे. अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेला गोळीबार आणि त्यात वापरली गेलेली पिस्तुलं चिनी बनावटीचीच होती. यावरून मुंबईतल्या छोट्या मोठ्या गुंड टोळ्यांना शस्त्र पुरवण्याचे काम छुप्या पद्धतीने सुरू आहे हे त्यातून स्पष्ट होते. पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाला या अवैध शस्त्रतस्करीची टीप मिळाली होती. त्यानंतर सापळा रचून त्यातल्या तिघा जणांना अटक झाली आहे. याच दिवशी धुळे येथे राहणाऱ्या दोघांना अटक केली गेली. त्यांच्याकडे तीन गावठी कट्टे आणि काडतुसं जप्त केली गेली. नाशिक येथे विक्रीसाठी आणल्याचे तपासात निष्पन्न झाले. ही शस्त्रे मध्य प्रदेशातून आणली गेली होती. नांदेड येथे मोठा शस्त्रसाठा जप्त झाला त्यात ४७० तलवारी, २०५ खंजर, असा मोठा शस्त्रसाठा नांदेड येथे जप्त केला गेला. त्याची जवळपास चौदा लाख रुपये किंमत होते. तस्करी करून आणलेली ही शस्त्र राज्यातल्या गुंडांना एवढेच नव्हे तर फरार असलेल्या आरोपींपर्यंतही पोहोचवली जातात. नागपूर किंवा पुण्यातल्या तलवार गँगकडे एवढ्या तलवारी कुठून येत असतील याचेही उत्तर नांदेडच्या या शस्त्रसाठ्यातून मिळते.

### या शस्त्र तस्करीचा अर्थ

राज्यातल्या गुंडगिरीचे स्वरूपही बदलत असले तरीसुद्धा ज्यावेळी असे शस्त्रसाठे सापडतात त्यावेळेला त्याचा वापर करणाऱ्यांची संख्यादेखील पूर्वीइतकीच कायम असल्याचे म्हणावे लागते. कोणतीही गुन्हेगारी किंवा गुंडगिरी टिकून राहते याचा अर्थ तिला छुपे प्रोत्साहन आणि संरक्षणही मिळत असते. पुणे, नागपूरमध्ये त्याच त्या गुंडांच्या टोळ्या भरदिवसा लूटमार करीत असतात. दुचाकी चार चाकी वाहनांना आगी लावण्यापासून ते त्याची तोडफोड करण्यापर्यंत किंवा असे हे तलवारी कोयते घेऊन दुकानांमध्ये घुसायचे. आणि कोणाच्या सुपारीवरून दहशत निर्माण करायची हे प्रकारदेखील पोलिसांनी केलेल्या दुर्लक्षामुळेच होऊ शकतात. हे गुंड राहतात कुठे, त्यांचे अवैध धंदे काय आहेत. याची सगळी माहिती पोलिसांकडे असते. परंतु सोयिस्कररित्या त्याकडे दुर्लक्ष होते. एखादी कार किंवा मोटरसायकल जरी चोरीला गेली तरी अशा चोऱ्या करणाऱ्यांचा ठावठिकाणाही पोलिसांना असतो. जर पोलिसांच्या मागे धोशा लावला किंवा मोटरसायकल मिळवून देण्यासंदर्भात मोबदला देण्याचे कबूल केले तर चोरीला गेलेल्या गाड्यासुद्धा पुढच्या दोन-चार दिवसांत सापडतात. हेच प्रकार रेल्वे स्टेशन्स बस डेपोंच्या परिसरात घडत असतात. छोट्या मोठ्या चोऱ्यामाऱ्यांपासून ते संघटित गुन्हेगारीपर्यंत नकळत मिळणारे हे संरक्षण कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणारे असतात. गुन्हेगारी कमी होते आहे हा दावा कागदावरच्या आकड्यांवरून जरी खरा वाटत असला तरी ज्या पद्धतीने अवैधपणे शस्त्रांची विक्री होते आहे त्यावरून गुन्हेगारी जिवंत ठेवण्याचे कामही चालू आहे हेदेखील स्पष्ट होते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

चांगल्यांसोबत चांगले राहा, पण वाईटांसोबत वाईट होऊ नका. कारण हिऱ्याला घासून चमक आणता येते, पण चिखलाने चिखल कधीच स्वच्छ होत नाही.

## पंचांग



**सोमवार, २५ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ शुक्ल दशमी**
**नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०९-०६ सिंह**
**०९-०७ ते २४-०० कन्या**

**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-०९**

**गंगा दशहरा समाप्ती; गंगावतार; सूर्य रोहिणीला दुपारी ३.३७**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### बिस्कीट आंबोडा



★ **साहित्य :** २ वाट्या उडदाची डाळ, २ चमचे भरडलेली काळीमिरी, २ चमचे ओल्या खोबऱ्याचे बारीक काप, २ चमचे बारीक चिरून हिरव्या मिरच्या, मीठ आवश्यकतेनुसार, १/२ चमचा हिंग, तळण्यासाठी तेल गरजेनुसार
१ वाटी चटणीसाठी: ओलं खोबरं, १/४ चमचा हिंग, १ चमचा काश्मिरी मिरची पावडर, १ चमचा साखर, १ चमचा चिंचेचा कोळ, १/२ चमचा मीठ, १ चमचा साखर

★ **कृती :** प्रथम उडदाची डाळ सहा तास भिजवून मिक्सरच्या लहान भांड्यातून घट्ट वाटून घ्यावे आणि त्यामध्ये इतर सर्व साहित्य मिक्स करून दहा मिनिटं फेटून घ्यावे. फेटल्यामुळे पीठ हलकं होतं आणि वडे सुद्धा हलके होतात, तेल पीत नाही. कढईमध्ये तेल तापण्यासाठी ठेवावं आणि चटणीसाठीचे सर्व साहित्य एकत्र करून मिक्सरमध्ये छान चटणी वाटून घ्यावी आणि आवडत असल्यास वरून राई, कढीपत्ता, हिंगाची फोडणी द्यावी.
कढईतील तेल तापल्यावर गॅस मध्यम करून आपण उडदाचे वाटलेले पीठ हातात घेऊन गोल गोल असे वडे तेलात सोडावेत. ते शिजल्यानंतर तेलामध्ये वर तरंगतील ही खुण लक्षात ठेवावी असे तांबूस रंगाचे वडे तळून काढावेत. गरमागरम वडे आणि लाल रंगाची छान हिंगाची चटणी सर्व करावी.

## क्रीडा



# बालेकिल्ल्यात मुंबईला पराभूत करून राजस्थान रॉयल्सची प्लेऑफमध्ये धडक



**आयपीएलच्या प्राथमिक फेरीच्या आज झालेल्या अखेरच्या दोन सामन्यांपैकी पहिल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सला ३० धावांनी पराभूत करून प्लेऑफमध्ये प्रवेश केला. वानखेडे स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने २० षटकांत ८ गडी गमावून २०५ धावा केल्या. प्रत्युत्तरात मुंबईला ९ गडी गमावून केवळ १७५ धावाच करता आल्या. राजस्थानच्या विजयामुळे कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्सचा आयपीएल २०२६ मधील प्रवासही संपला आहे.**

■ मुंबई



**राजस्थानच्या** एकाही फलंदाजाला अर्धशतक गाठता आले नाही. ध्रुव जुरेलने सर्वाधिक ३८ धावांची खेळी केली. जोफ्रा आर्चरने १५ चेंडूंत ३२ धावा केल्या आणि दसून शनाकाने २९ धावांचे योगदान दिले. डावाच्या अखेरीस, रवींद्र जडेजा आणि नँद्रे बर्गर यांनी वेगाने धावा करून संघाची धावसंख्या २०० धावांपार नेली. मुंबईकडून दीपक चहर आणि शार्दुल ठाकूर यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर विल जॅक्स, अल्लाह गझनफर आणि कॉर्बिन बॉश यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला.

राजस्थानच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईला २० षटकांत ९ गडी गमावून फक्त १७५ धावा करता आल्या. मुंबई इंडियन्सकडून सूर्यकुमार यादवने ४२ चेंडूंमध्ये ३ चौकार आणि ४ षटकारांसह सर्वाधिक ६० धावा केल्या. कर्णधार हार्दिक पांड्याने ३४, तर विल जॅक्सने ३३ धावा केल्या. राजस्थानकडून जोफ्रा आर्चरने तीन बळी घेतले, तर नँद्रे बर्गर, ब्रिजेश शर्मा आणि यशराज पुंजा यांनी प्रत्येकी दोन बळी टिपले.

आयपीएलच्या पहिल्या फेरीचे सर्व सामने संपल्यानंतर आता अंतिम ४ संघ निश्चित झाले आहेत. गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांनी अव्वल ४ संघात स्थान मिळवले आहे. २६ मे रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध गुजरात टायटन्स हा क्वालिफायर-१ चा सामना होणार आहे. तर सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स हा एलिमिनेटर-१चा सामना २७ मे रोजी होईल.

## एलआयसी कल्पेश गोविंद कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धेचे चर्चगेट विजेते

■ मुंबई

**आरुष** कोल्हेच्या शानदार १६३ धावांच्या खेळीच्या जोरावर चर्चगेट सेंटरने ३४व्या एलआयसी कल्पेश गोविंद कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. न्यू हिंद स्पोर्टिंग क्लब, माटुंगा येथे झालेल्या अंतिम सामन्यात चर्चगेट सेंटरने ठाणे सेंटरवर पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना ठाणे सेंटरचा डाव १३८ धावांत आटोपला. प्रत्युत्तरात चर्चगेट सेंटरने १२४ षटकांत ७ बाद ३७० धावा उभारल्या. आरुष कोल्हेने १६३ धावांची अप्रतिम खेळी साकारली, तर निखिल गुरव (७७) आणि शार्दूल फागरे (६८) यांनी उत्तम साथ दिली. अंतिम सामन्याचा सामनावीर पुरस्कार आरुष कोल्हे याला प्रदान करण्यात आला.

## दिल्लीची कोलकात्यावर ४० धावांनी मात

■ कोलकाता

**आयपीएल** २०२६ च्या शेवटच्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने कोलकाता नाईट रायडर्सला ४० धावांनी पराभूत केले. ईडन गार्डन्सवर नाणेफेक गमावल्यानंतर दिल्लीने २० षटकांत ५ गडी गमावून २०३ धावा केल्या. दिल्लीला प्रत्युत्तर देताना कोलकाताने २० षटकात सर्वबाद १६३ धावाच केल्या.

दिल्लीच्या केएल राहुलने ३० चेंडूंमध्ये पाच चौकार आणि चार षटकारांसह सर्वाधिक ६० धावा केल्या. अक्षर पटेलने कर्णधाराला साजेशी ३९ धावांची खेळी करत संघाचे नेतृत्व केले, तर डेव्हिड मिलरने २८ आणि आशुतोष शर्माने नाबाद १८ धावांचे योगदान देत संघाला २०० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. सौरभ दुबेने २८ धावांत दोन बळी टिपले. तर सुनील नारायण आणि वरुण चक्रवर्तीने एकेक गडी बाद केला.

कोलकात्याच्या डावात कर्णधार अजिंक्य रहाणे आणि फिल ॲलनने पहिल्या विकेटसाठी ४३ धावांची भागीदारी केली. ॲलन २० धावांवर बाद झाला. त्यानंतर अजिंक्य रहाणेने चमकदार फटके मारत डाव सांभाळला. मात्र मनिष पांडे २५, तर रोव्हमन पॉवेलने २९ धावा करून बाद झाल्यावर रहाणेही ६३ धावांवर तंबूत परतला. कॅमेरन ग्रीनला फक्त २ धावा करता आल्या. ३ बाद १२८ वरून कोलकाताची सर्वबाद १६३ अशी घसरगुंडी उडाली. कुलदीप यादव आणि एनगिडीने प्रत्येकी ३ बळी घेतले, तर मिशेल स्टार्कने २ गडी बाद केले.

## तुझा अभिमान आहे! अर्जुनसाठी सचिन तेंडुलकरची भावुक पोस्ट

■ नवी दिल्ली



**आयपीएल** २०२६ मध्ये लखनौ सुपर जायंट्सकडून पदार्पण करणाऱ्या अर्जुन तेंडुलकरचे वडील आणि महान फलंदाज सचिन तेंडुलकरने त्याचे कौतुक केले आहे. पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यानंतर सचिन यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर केली असून, ती सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

सचिन यांनी आपल्या पोस्टमध्ये अर्जुनच्या जिद्दीचे आणि संयमाचे विशेष कौतुक केले. सचिन म्हणाला की, शाब्बास अर्जुन, तुझ्या वृत्तीचा मला अभिमान आहे. तू स्वतःवर विश्वास ठेवला, संयम राखला आणि शेवटपर्यंत सकारात्मक राहिलास. क्रिकेट हे केवळ कौशल्याचे नव्हे तर संयमाचेही खेळ आहे आणि आज तू दोन्ही गोष्टी उत्कृष्टपणे हाताळल्या.

लखनौ संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडल्यानंतर शेवटच्या साखळी सामन्यात अर्जुनला पदार्पणाची संधी मिळाली. त्याने फलंदाजीत पाच चेंडूंमध्ये पाच धावा केल्या, तर गोलंदाजीत चार षटकांत ३६ धावा देत एक महत्त्वाचा बळी घेतला. त्याचा इकॉनॉमी रेट संघातील इतर गोलंदाजांपेक्षा सरस होता. अर्जुनच्या पहिल्याच षटकात प्रभासिमरन सिंगचा झेल कर्णधार यष्टीरक्षक ऋषभ पंतकडून झेल सुटला होता. त्यानंतर अर्जुनने पुढील षटकात शानदार यॉर्करवर प्रभासिमरनला पायचित बाद केले.

मुंबई इंडियन्स व्यतिरिक्त दुसऱ्या संघाकडून खेळण्याची अर्जुनची ही त्याची पहिलीच वेळ आहे.

## भारतीय महिला क्रिकेट संघ विश्वचषकासाठी इंग्लंडला रवाना

■ नवी दिल्ली

**भारतीय** महिला क्रिकेट संघ काल टी-२० विश्वचषकात सहभागी होण्यासाठी मुंबईहून इंग्लंडला रवाना झाला. चाहत्यांनी ढोल-ताशांच्या गजरात खेळाडूंना टिळा लावून निरोप दिला. हा संघ विश्वचषकापूर्वी इंग्लंडविरुद्ध ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. ही मालिका २८ मार्चपासून सुरू होत आहे.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ इंग्लंडमधील मैदानात उतरत आहे, जिने गेल्या वर्षी भारताला पहिल्यांदा महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिला होता. त्या संघातील ११ खेळाडू सध्याच्या संघात आहेत. भारताचा पहिला सामना १४ जून रोजी एजबेस्टन येथे पाकिस्तानशी खेळला जाईल. त्यानंतर नेदरलँड्स, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश आणि ऑस्ट्रेलियाशी सामने होणार आहेत. स्पर्धेत एकूण १२ संघ खेळणार असून, प्रत्येकी दोन गटांमध्ये त्यांची विभागणी करण्यात आली आहे.

## बोटाच्या दुखापतीमुळे बंगळुरूचा जॅकब बेथेल आयपीएलमधून बाहेर

■ बंगळुरू



**रॉयल** चॅलेंज बंगळुरूचा सलामीवीर इंग्लंडचा जॅकब बेथेल बोटाच्या दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर पडला आहे. तो उपचार व देखरेखीसाठी इंग्लंडला परतणार आहे. बेथेलला १७ मे रोजी पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात ही दुखापत झाली होती.

बेथेलने आयपीएलच्या या हंगामात बंगळुरूसाठी ७ सामने खेळले आणि ९६ धावा केल्या आहेत. दुखापतीमुळे तो हैदराबादविरुद्धचा शेवटचा सामनाही खेळू शकला नाही. त्या सामन्यात बंगळुरूने व्यंकटेश अय्यरला सलामीला उतरवले होते. इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्ड (ईसीबी) ने सांगितले की, बेथेलच्या दुखापतीवर इंग्लंडची वैद्यकीय टीम लक्ष ठेवणार आहे. त्यानंतर तो ४ जूनपासून लॉर्ड्समध्ये न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीत खेळू शकेल की नाही, हे निश्चित होईल. दरम्यान, राजस्थानचा यष्टिरक्षक-फलंदाज रवी सिंग हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी पंजाबचा युवा अष्टपैलू खेळाडू इमनजोत चहलला संघात समाविष्ट करण्यात आले आहे.

## पुण्यात महिला क्रिकेटपटूंच्या सन्मानार्थ क्रिकेट रत्न पुरस्कार २०२६ सोहळा

■ पुणे

**क्रिकेटच्या** मैदानात आपल्या अष्टपैलू कामगिरीने महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव उंचावणाऱ्या महिला क्रिकेटपटूंचा सन्मानार्थ पुण्यात एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारत अगेन्स्ट करप्शन'चे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २८ मे रोजी सायंकाळी ५.०० वाजता, पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे हा 'क्रिकेट रत्न पुरस्कार २०२६' सोहळा होणार आहे. या सोहळ्याला माजी रणजी क्रिकेटपटू हेमंत किणीकर आणि राष्ट्रीय महिला क्रिकेटपटू कुमारी अनुजा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावर्षीचा प्रतिष्ठित 'क्रिकेट रत्न पुरस्कार' महिला क्रिकेट विश्वात आपली ओळख निर्माण करणाऱ्या, डब्ल्यूपीएल आणि आयपीएलमध्ये अष्टपैलू खेळीने आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या पूनम खेमनार, स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेल्या तसेच मैदानात उत्तुंग षटकार ठोकत महिला क्रिकेटमध्ये एक वेगळी आणि आक्रमक ओळख निर्माण करणाऱ्या आयपीएल खेळाडू किरण नवगिरे यांना प्रदान केला जाईल.

उत्कृष्ट गोलंदाजी आणि कठीण प्रसंगात संघाला सावरणाऱ्या फलंदाजीच्या जोरावर आयपीएलच्या मंचावर स्वतःला सिद्ध करणाऱ्या गौतमी नाईक, देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करत महाराष्ट्राच्या संघाला अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये विजय मिळवून देणाऱ्या भक्ती मिरजकर, उत्कृष्ट तंत्र आणि अष्टपैलू कौशल्याच्या जोरावर अत्यंत कमी वयात क्रिकेट वर्तुळात आपली छाप सोडणाऱ्या अक्षया जाधव यांचादेखील गौरव केला जाईल. महिला क्रिकेटपटूंच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान तसेच त्यांना भविष्यातील यशाकरीता प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे पाटील म्हणाले.

# सुख शांती समाधान

## अधिक महिन्यात देवासमोर लावा कमळवातीचा दिवा

अधिक महिन्यात (पुरुषोत्तम मासात) कमळ वातींचे दिवे लावणे अत्यंत शुभ आणि फलदायी मानले जाते. या संदर्भात खालील महत्त्वाची माहिती लक्षात ठेवा: महत्त्व: कमळ वातींचे (कमळाच्या धाग्यापासून बनवलेली वात) दिवे हे भगवान विष्णू आणि लक्ष्मी माता यांना अत्यंत प्रिय आहेत. कालावधी: अधिक मासात (धोंडा महिन्यात) दररोज किंवा विशेषत: एकादशी, चतुर्दशी, पौर्णिमा या तिथींना संध्याकाळी तुळशीजवळ किंवा देवघरात हे दिवे लावावे. फळ: असे मानले जाते की, या वातींनी दिवा



लावल्याने घरातील नकारात्मकता दूर होते, आर्थिक समृद्धी येते आणि लक्ष्मी-विष्णूंची कृपा प्राप्त होते.

## अधिक महिन्यात हे उपाय करा...

**सध्या अधिक महिना सुरू आहे. जो आपल्याला अधिक पुण्य मिळविण्यासाठी बोनस महिना आहे असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. ज्याला आपण ‘पुरुषोत्तम**



**मास’ म्हणून ओळखतो. हा काळ अध्यात्म आणि आत्मिक प्रगतीसाठी अत्यंत फलदायी मानला जातो. या काळात केलेली उपासना इतर वेळेपेक्षा कैक पटीने अधिक पुण्य देऊन जाते. जर तुम्हाला या महिन्यात आपली आध्यात्मिक ऊर्जा वाढवायची असेल, तर भगवान श्रीकृष्णाला प्रिय असलेला भगवद्गीतेतील १५ वा अध्याय आणि पुढे दिलेल्या विष्णु मंत्राचा जप हा सर्वोत्तम मार्ग आहे. या महिन्याचा अधिपती स्वत: भगवान विष्णू (पुरुषोत्तम) आहेत. या काळात काही विशिष्ट नियमांचे पालन केल्यास जीवनातील संकटे दूर होऊन सुख-समृद्धी लाभते. यासाठी व्रत स्वरूप एखादी उपासना नियमितपणे महिनाभर करावी असे शास्त्र सांगते.**

भगवद्गीतेतील १५ व्या अध्यायाला ‘पुरुषोत्तम योग’ असे नाव आहे. अधिक मासात या अध्यायाचे वाचन करण्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

या अध्यायात संसाररूपी वृक्षाचे (अश्वत्थ वृक्ष) वर्णन केले आहे. भगवान श्रीकृष्ण सांगतात की, या जगाच्या मोहजालातून बाहेर पडण्यासाठी ज्ञानाची कुऱ्हाड आवश्यक आहे. याचे नित्य पठण केल्याने, त्याचा अर्थ समजून घेतल्याने मनुष्याला संसारातील आसक्तीतून मुक्ती मिळते आणि परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते. अधिक मासात रोज १५ व्या अध्यायाचे वाचन केल्याने पितृदोष निवारण होते आणि अक्षय पुण्याची प्राप्ती होते असे मानले जाते.

सकाळी लवकर उठून स्नान करावे. देवासमोर दिवा लावून शांत चित्ताने बसावे. प्रथम १५ व्या अध्यायाचे मनोभावे वाचन करावे. त्यानंतर ‘ओम नमो भगवते वासुदेवाय’ मंत्राचे सामर्थ्य हा १२ अक्षरी मंत्र अत्यंत शक्तिशाली आणि प्रभावशाली आहे. अधिक मासात तुळशीच्या माळेवर रोज १०८ वेळा या मंत्राचा जप करावा. हा तोच मंत्र आहे ज्याच्या जोरावर भक्त ध्रुवाने बालपणीच ईश्वराची प्राप्ती करून घेतली होती.

मानसिक शांती: या मंत्राच्या उच्चारणाने मनातील नकारात्मक विचार दूर होतात आणि एकाग्रता वाढते.

हा मंत्र एक सुरक्षा कवच म्हणून कार्य करतो, ज्यामुळे घरातील कलह आणि बाहेरील बाधा दूर होतात.

निष्काम भावनेने जप केल्यास हा मंत्र जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती देण्यास समर्थ आहे.

एरवाद्या देवळात नियमाने जावे.

कुटुंब, इष्टमित्रांसह एरवाद्या तीर्थक्षेत्री जावे.

एरवाद्या तीर्थक्षेत्राचे भ्रमण आपल्या जीवनात आनंद देतील.

या अधिकमासात शक्य असल्यास संपूर्ण महिना जमिनीवरच झोपावे.

शुभ फळाची प्राप्तीसाठी दररोज सूर्योदयाच्या पूर्वी स्नान करून गुरूंच्या चित्रांची पूजा करून दर्शन घ्या.

भजन किंवा धार्मिक संगीत ऐकणे किंवा करणे आपल्यासाठी सौख्यकारी असणार.

आपल्या कुळदेव किंवा आराध्यदेवाचे दररोज १०८ वेळा जप करावे. जेणे करून आपणांस सुख आणि शांती मिळते.

या महिन्यात एरवादे धार्मिक शास्त्र वाचल्याने शुभ फळाची प्राप्ती होते.

एरवादे देऊळ किंवा तीर्थक्षेत्रात पवित्र कार्यात जसे की झाडून काढणे, लादी पुसणे सारखे सहकार्य केल्याने लाभ मिळेल.

तेलाचा आणि तुपाचा दिवा लावून किमान अर्धातास तरी ठराविक काळात शांतता बाळगण्याने मानसिक शक्ती वाढते.

नियमाने एरवाद्या संत किंवा महात्म्याची सेवा करणे किंवा त्याच्या चारित्र्याचे वाचन केल्याने आपल्यासाठी समृद्धशाली असणार.

दररोज एरवाद्या देवाचे १०८ वेळा नामस्मरण किंवा मंत्राचे लेखन केल्याने शुभ फळाची प्राप्ती होते. तसेच माणसाने ध्यान-देणगी, व्रत कैवल्य, जप-तप, पूजा-उपासना आवर्जून करावे. असे केल्याने आयुष्यातील सर्व त्रास आणि कष्टातून सुटका होते.

## अधिकमासाला धोंड्याचा महिना का म्हणतात?

अधिकमासाला धोंड्याचा महिना देखील म्हणतात. अधिकमास हा महिना दर तीन वर्षांनी येतो. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी अधिक मासाला धोंड्याचा महिना असे म्हटले जाते. नियमित सुरू असलेल्या कालगणनेत आडमुठ्यासारखा, मध्येच आलेल्या दगडासारखा (धोंड्यासारखा) आलेला महिना म्हणून धोंड्याचा महिना असेही एक मत आहे. मात्र, धोंडा आणि अधिक मास यांना जोडणारा एक खाद्यपदार्थ आहे, त्याला ‘धोंडा’ म्हटले जाते. पुरण घालून गोल लाडवासारखा किंवा धोंड्यासारखा वळून उकडवला जातो. त्याला धोंड्याचा नैवेद्य म्हणतात. या महिन्यात या धोंड्याच्या जेवणाला पाहुण्यांना आवर्जून बोलावले जाते. तसेच जावयालाही आग्रहाने बोलावले जाते व धोंडे खाऊ घातले जातात आणि त्याच्या रुपाने नारायणाने धोंड्यांचा नैवेद्य स्वीकार केला, असे समजतात.

## मुलीने या महिन्यात आईची ओटी आवर्जून भरावी

**पूर्वी घरी आलेल्या सुवासिनीला ओटी भरल्याशिवाय पाठवत नसत. ओटी भरणे, हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा संस्कार. सुवासिनीला संततीप्राप्ती व्हावी, म्हणून तिची ओटी भरली जाते. ‘संततीप्राप्ती’च्या आशीर्वादाचे हे प्रतिकात्मक स्वरूप असते. मात्र, केवळ अधिक मासातच, विवाहित मुलगी आपल्या सवाष्ण आईची ओटी भरू शकते.**

‘अधिकस्य अधिकं फलं’ अर्थात अधिक मासाचे अधिक फळ पदरात कसे पाडावे? लग्नकार्यात कन्यादानाला अतिशय महत्त्व असते. आपल्या लाडक्या लेकीला सुयोग्य हाती सोपवून तिची जबाबदारी तिच्या पतीच्या हाती सोपवणे, याला कन्यादान विधी म्हणतात. त्याचा चुकीचा अर्थ काढत, कन्या काय दान देण्याची वस्तू आहे का? अशी चर्चा करतात. मात्र तसे



नसून, कन्यादान हा एक संस्कार आहे. जबाबदारीची जाणीव आहे. आपण ज्या मुलीला लाडाकोडाने वाढवली, तिची जबाबदारी दुसऱ्याच्या हाती सोपवण्यासाठी आई-वडिलांना कठोर व्हावे लागते. त्यांच्या त्यागामुळे तिला तिचे हक्काचे घर मिळते. त्या कृतज्ञतेची छोटीशी परतफेड म्हणून विवाहित मुलगी अधिक मासात आपल्या आईची ओटी भरते.

अधिक मासच का? अधिक मासात सगळीच पुण्यकर्मे केली जातात. त्यात आणखी एका पुण्यकर्माची भर, म्हणून आईची ओटी भरली जाते. वास्तविक पाहता, मुलगी सासरी निघाली की, तिची ओटी भरतात. परंतु, अधिक मासात आईची ओटी भरून तिने आपल्या पदरात टाकलेल्या सौभाग्याप्रती छोटीशी कृतज्ञता व्यक्त केली जाते. पुढच्या जन्मी तुझ्याच उदरी जन्म मिळावा, असाही संयुक्तिक अर्थ या संस्कारातून काढता येतो. विवाहित मुलगी आईची ओटी भरू शकते. परंतु सासूची ओटी भरू शकत नाही. कारण, लग्न करून घरी आल्यावर सासु आपल्या सुनेची ओटी भरून आपला मुलगा राजीखुशी तिच्या पदरात देते. सासुकडून आशीर्वादरूपी मिळालेली ओटी तिला परत करता येत नाही.

**टीप**- या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. ‘नवाकाळ’ त्याचे समर्थन करत नाही.

## आरटीईअंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

■ ठाणे

**महाराष्ट्र** शासनाच्या आरटीई अर्थात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत राज्यातील खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेस आणि कागदपत्र पडताळणीस शिक्षण विभागाने मुदतवाढ दिली आहे.

प्रतीक्षा यादीतील पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आता २९ मे पर्यंत मुदत देण्यात आली आहे. याआधी प्रतीक्षा यादीतील पात्र बालकांसाठी प्रवेश निश्चित करण्याची अंतिम तारीख २३ मे होती. ती आता २९ मे करण्यात आली आहे. हे प्रवेश निश्चित करताना पालकांनी उत्पन्नाचा दाखला, जन्माचा दाखला, रहिवासी पुरावा, आणि जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) सोबत बाळगणे आवश्यक आहे. ठाणे जिल्ह्यातील एकूण १९५६ बालकांची पहिल्या टप्प्यात निवड झाली आहे. तरी संबंधित पालकांना याबाबत एसएमएसद्वारे कळविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील शाळांमध्ये रिक्त असलेल्या जागांनुसार या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी हे संदेश पाठवले जात आहेत.

## मिरा-भाईंदरमध्ये बनावट रिक्षा परिमट घोटाळा

### २७ जणांविरोधात गुन्हे दाखल

■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** शहरात बनावट कागदपत्रांच्या आधारे रिक्षा परवाने मिळवल्याप्रकरणी अखेर २७ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिरा-भाईंदर शहरात बोगस रिक्षांचा सुळसुळाट झालेला आहे. अनेक रिक्षाचालकांनी बनावट रेशन कार्ड, आधार कार्ड, जन्म दाखला, रहिवाशी दाखला व इतर कागदपत्रांच्या आधारे परमिट, बॅच मिळवल्याचा आरोप आमदार नरेंद्र मेहता यांनी केला होता. याप्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील सर्व रिक्षा परवान्यांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश उप-प्रादेशिक परिवहन विभागाला दिले होते.

भाजपा नेते किरीट सोमया यांनीही शहरात शेकडो बोगस जन्मदाखले दिल्याचा आरोप केला होता. याबाबत गुन्हे शाखेने तपास सुरू केला होता. या प्रकरणाच्या तपासात एकाच जन्म दाखल्यावर अनेक रहिवासी दाखले तयार करण्यात आल्याचे उघड झाले. बनावट वीजबिलांच्या आधारे शिधापत्रिका तयार करून त्यानंतर रिक्षा बॅच व परवाने मिळवल्याचेही समोर आले. यानंतर काशिमिरा पोलीस ठाण्यात २७ रिक्षा बॅचधारकांविरोधात बनावट दस्तावेज, शिक्के, सिल तयार केल्याप्रकरणी विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. परिवहन मंत्र्यांच्या मतदारसंघातच परमिट घोटाळा सुरू असल्याचे आमदार नरेंद्र मेहता यांनी सांगितले होते. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून, अशा प्रकारचे हजारो दाखले देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला होता.

## सरकारी वसतिगृहात एसीसाठी दरमहा विद्यार्थ्यांकडून ५ हजारांची वसुली

### विद्यार्थ्यांचा आरोप

■ अहमदाबाद

**अहमदाबादमधील** एनएचएल मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे पैसे उकळले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सरकारी वसतिगृहात एसी आणि कूलर वापरण्यास नियमांनुसार बंदी असतानाही वसतिगृह प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना दरमहा प्रत्येकी ५ हजार रुपये घेऊन एसी वापरण्याची परवानगी दिली जात असल्याचे सांगितले जात आहे. फ्रिज आणि इंडक्शन स्टोव्ह वापरण्यासाठीही स्वतंत्र पैसे घेतले जात असल्याचा आरोप आहे. हे पैसे सरकारी खात्यात जमा न होता थेट वसतिगृह अधिकाऱ्यांच्या खिशात जात असल्याचेही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

हा प्रकार केवळ विद्युत उपकरणांपुरता मर्यादित नसून, वसतिगृहाच्या नियमांनुसार विद्यार्थ्यांनी रूम शेअर करणे बंधनकारक असतानाही, सिंगल रूम हवी असल्यास विद्यार्थ्यांकडून दरमहा ८ ते १० हजार रुपये अतिरिक्त घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### जाहीर सूचना

**ज्यांच्याशी संबंधित आहे त्यांच्याकरिता**

याद्वारे श्री. परवेझ फकीर मोहम्मद हेतावकर यांच्या वतीने सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, घाटकोपर इंडस्ट्रीज इस्टेट म्हणून ज्ञात इमारतीच्या ‘सी’ ब्लॉकमधील २ऱ्या मजल्यावरील युनिट क्र.२२०, घाटकोपर (पश्चिम), मुंबई – ४०००८६ संदर्भातील सन १९७२ मधील मूळ करारपत्रे, जी ईश्वरदास हरिदास भाटिया बिल्डर अँण्ड डेव्हलपर्स आणि खरेदीदार तसेच सदर युनिटचे पहिले मूळ मालक राम तेजूमल दडलानी यांच्यामध्ये करण्यात आली होती. सदर करारपत्रांनुसार, दिनांक १ डिसेंबर १९८० रोजी सदर मालमत्ता दुसरे मालक श्री. लोकू आर. आहुजा यांना विकण्यात आली होती. त्यानंतर दिनांक ११.०६.१९९३ रोजीच्या करारानुसार, मे. आशा प्लास्टिक्स कॉर्पोरेशनचे श्री. विजय गौरीशंकर त्रिवेदी यांना तिसरे मालक म्हणून विक्री करण्यात आली होती. ही करारपत्रे सदर मालमत्तेच्या हक्क साखळीतील अत्यावश्यक व महत्त्वाची कडी आहेत. वरील नमूद मालमत्ता म्हणजे गाळा क्र. सी-२२० संदर्भातील सर्व मूळ करारपत्रे हरवलेली किंवा गहाळ झालेली असून ती आता शोधूनही सापडत नाहीत. त्यामुळे सदर मालमत्ता किंवा सदर मालकाविरुद्ध विक्री, गहाण, शुल्क, ट्रस्ट, धारणाधिकार, ताबा, भेट, देखभाल, वारसा, भाडेपट्टा, जप्ती किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क, शिर्षक, हितसंबंध किंवा मागणी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, त्यासंबंधित पुराव्याची कागदपत्रे जोडून, खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात - फ्लॅट क्र.डी/३२१, सागर पार्क, अमृत नगर, घाटकोपर (पश्चिम), मुंबई – ४०००५६ येथे, या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, अशा व्यक्तीचा दावा त्याग केलेला आणि/किंवा सोडून दिलेला मानण्यात येईल.

**ठिकाण: मुंबई** **अशोक व्ही. तिवारी**
**दिनांक: २५ मे २०२६ वकील, उच्च न्यायालय**

### प्रस्तावांकरिता आमंत्रण: इमारत दुरुस्तीकरिता वास्तुविशारद/ संरचनात्मक सल्लागार

**दि अलमास को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.**
विवारीया टॉवर्स समोर, महालक्ष्मी, मुंबई - ४०००११.

इच्छुक पक्षकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे प्रस्ताव संस्थेच्या कार्यालयात पुढील **१५ दिवसांमध्ये स. ११.०० ते दु. १.०० या वेळेत** सादर करावे.

संपर्क: सलमान मुल्ला (सचिव)
**almaschsltd@gmail.com**

### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, **सौ. प्रिती महेश ठाकूर** भारतीय निवासी, राहणार - दादर (प), मुंबई - २८ ***या मे. टेक्निक इन्फ्रास्ट्रक्चर, जीएसटी क्र. 27AAEFT9100G1ZA आणि पॅन क्र. AAEFT9100G या अनोंदणीकृत भागिदारी संस्थेमधून दि. २७ ऑगस्ट, २०२५ रोजी बनविलेल्या निवृत्ती करारनाम्यानुसार दि. १३ जुलै, २१ पासून निवृत्त झाल्या आहेत.*** सदर संस्था ए/३ नूतन नगर सीएचएस, स्टेशन रोड, वांद्रे (प), मुंबई-५० येथून काम करीत होती. याद्वारे सूचित करण्यात येते की, सौ. प्रिती महेश ठाकूर या दि. १३ जुलै, २१ नंतर **मे. टेक्निक इन्फ्रास्ट्रक्चर** द्वारे केलेल्या कोणत्याही कृती, कृत्ये, देणी, व्यवहार किंवा दायित्वांकरिता जबाबदार किंवा उत्तरदायी नसतील आणि कोणी व्यक्ती सदर संस्थेसोबत व्यवहार करीत असल्यास त्यांनी तसे त्यांच्या स्वतःच्या जोखीम आणि खर्चावर करावे.

ठिकाण: मुंबई सही/-
**सौ. प्रिती महेश ठाकूर**
**(निवृत्त भागिदार)**

### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, **सौ. प्रिती महेश ठाकूर** यांनी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेमधील त्यांच्या हक्क, शीर्षक आणि हितसंबंधाच्या संबंधातील **इंडेक्स II नोंदणी क्र. १३२३४/२०२५ दिनांक १०.०९.२०२५** नुसार उप-निबंधक, खेड-२ यांच्या कार्यालयामध्ये योग्यरित्या बनविलेल्या नोंदणीकृत हक्कसोड पत्रामध्ये उल्लेखिलेल्या हक्क प्राप्तकर्ता/लाभार्थ्यांच्या नावे हक्कसोड पत्र बनविले आहे.

**शीर्षक:** गाव मौजेखराबवाडी, ता. खेड, जि. पुणे येथील खाता क्र. १५६९. **गट क्र.** ३५७/९४, **जुना गट क्र.** २८९१/९४.

ठिकाण: मुंबई सही/-
**सौ. प्रिती महेश ठाकूर**

### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. महेश मुकुंद ठाकूर** यांनी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेमधील त्यांच्या हक्क, शीर्षक आणि हितसंबंधाच्या संबंधातील, **दिनांक १०.०९.२०२५** रोजी उप-निबंधक, खेड-२ यांच्या कार्यालयामध्ये योग्यरित्या बनविलेल्या नोंदणीकृत हक्कसोड पत्रामध्ये उल्लेखिलेल्या हक्क प्राप्तकर्ता/लाभार्थ्यांच्या नावे हक्कसोड पत्र बनविले आहे.

**शीर्षक:** गाव मौजे खराबवाडी, ता. खेड, जि. पुणे येथील इंडेक्स II **नोंदणी क्र. १३२३२/२०२५** नुसार खाता क्र. १०३३, **गट क्र.** ३५७/९५ **गट क्र.** ३५७/९५ (**जुना गट क्र.** २८९१/९५) आणि खाता क्र. १०३२ गट क्र. ३५७/९५, **नोंदणी क्र. १३२३३/२०२५.**

ठिकाण: मुंबई सही/-
**श्री. महेश मुकुंद ठाकूर**

### जाहीर सूचना

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील (१) सौ. उमा एस. तुलसियान आणि (२) अभिनंदन एस तुलसियान, दोघेही भारतीय निवासी, त्यांचा पत्ता - १९०२, सुविधा एमेराल्ड, साई भक्ती मार्ग, रविंद्र नाट्य मंदिरजवळ, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ यांच्याकडून याखालील नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या जागा १ मधील त्यांचा हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध आणि (३) एस पी तुलसियान हिंदू अविभक्त कुटुंब, द्वारा त्यांचे कर्ता श्री. शशिकांत तुलसियान, भारतीय निवासी, त्यांचा पत्ता - १९०२, सुविधा एमेराल्ड, साई भक्ती मार्ग, रविंद्र नाट्य मंदिरजवळ, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ यांच्याकडून याखालील नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या जागा २ मधील त्यांचा हिस्सा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध (एकत्रितरित्या **“मालक”** असे उल्लेखित) खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

कार्यालय क्र. ४० च्या संबंधात एका भागाचे हिंद सौराष्ट्र कंस्ट्रक्शन कं. आणि सौ. दिलशाद सलिम मालाडवाला यांच्या दरम्यान बनलेले मूळ करारपत्र हरवले गहाळ झाले आहे आणि सापडत नाही. ते कोणत्याही ऋण किंवा अन्यथा कशाच्याही परताव्याकरिता प्रतिभूती म्हणून कोणा व्यक्ती किंवा व्यक्तींकडे किंवा बॉडी कॉर्पोरेटकडे जमा केलेले नाही.

मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, परवाना, विक्री, देवाणघेवाण, व्यवस्था, गहाणवट, न्याय्य गहाणवट, तारण सुरक्षा, भेट न्यास, वारसा, मृत्युपत्र, ताबा, वहिवाट, पूर्व अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, भागिदारी या मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याबाबत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास अशा दाव्याच्या संदर्भाशिवाय मालमत्तेचे हस्तांतरण माझ्या अशिलाच्या नावे पूर्ण करण्यात येईल

**अनुसूची**
**(मालमत्तेचे तपशील)**
**(जागा १ चे वर्णन)**

नोंदणी जिल्हा मुंबई उपनगरमध्ये ८७ ताडदेव मुख्य रस्ता, मुंबई ४०००३४ येथे स्थित मलबार आणि कंबाला हिल विभागाचा सीएस क्र. ७३१ (भाग) धारण केलेल्या जमिनीवरील **“ताडदेव एअर-कंडिशन्ड मार्केट” (“इमारत”)** या इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील कार्यालय क्र. **४०** मोजमाप १५.४२ चौ.मी. (कार्पेट क्षेत्रफळ) म्हणजेच १८.५१ चौ.मी. (बिल्ट अप क्षेत्रफळ) व त्यासह ताडदेव एअर-कंडिशन्ड मार्केट बिल्डींग को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड (**“संस्था”**) ची दि. २६ एप्रिल, १९६८ रोजी बीओएम/जीएनएल/१६० या क्रमांकाअंतर्गत सदस्यता आणि भाग प्रमाणपत्र क्र. **२९७** दिनांक ३० सप्टेंबर, १९६९ मधील डिस्टिंक्टिव्ह क्रमांक **१४८१ ते १४८५** (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे **५ (पाच)** समभाग.

आणि

**(जागा २ चे वर्णन)**

इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील कार्यालय क्र. **४१** मोजमाप १५.४२ चौ.मी. (कार्पेट क्षेत्रफळ) म्हणजेच १८.५१ चौ.मी. (बिल्ट अप क्षेत्रफळ) व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. २९८ दिनांक ३० सप्टेंबर, १९६९ मधील डिस्टिंक्टिव्ह क्रमांक **१४८६ ते १४९०** (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे **५ (पाच)** समभाग.

मुंबई, दिनांक २५ मे, २०२६

सही/-
(जैनी नंदू गांगर)
**ॲडव्होकेट**
२०१, मार्व्हल रेसिडेन्सी,
नंदा पाटकर मार्ग,
विलेपार्ले पूर्व, मुंबई - ४०००५७.

### जाहीर नोटीस

तमाम सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मौजे पाली तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील

| अनु. क्र. | सर्व्हे नं. | क्षेत्रफळ (हे.आर. प्र.) | आकार (रू.) |
|---|---|---|---|
| १ | ६५/५/ब<br>पोटखराबा | ० - ९४ - ९०<br>० - १२ - १० | १०७०-०० |
| २ | ६५/५/क | १ - ०९ - ०० | १०९०-०० |
| ३ | ६५/६/अ<br>पोटखराबा | ० - २० - ५०<br>० - ०६ - ०० | २६५-०० |
| ४ | ६६/१/अ<br>पोटखराबा | ४ - ५२ - ३०<br>३ - ०६ - ०० | ७५८३-०० |
| | एकूण क्षेत्रफळ | १० - ०० - ८० | |

अशी जमीन मिळकत **मे. आयडियाट्री रियल्टी प्रायव्हेट लिमिटेडतर्फे कु. मु. म्हणुन १) श्री. गुफरान इरफान जलगावकर, २) श्री. जनार्दन तुळशिराम पाटील, ३) श्री. घनश्याम चंद्रहार भोसले,** यांचे कडुन माझे अशील यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकती विषयी कोणत्याही व्यक्तीचा हक्क व अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, वारस, कर्ज लिखीत करार, खरेदीखत वा अन्य कोणताही हक्क असल्यास त्या व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आंत खालील पत्त्यावर लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह नोंदवावी हरकत न आल्यांस माझे अशील पुढचा व्यवहार करतील याची नोंद घ्यावी.

ऑफिस पत्ता:-
घर नं. ४७२/१०४, पहिला मजला,
श्री. कन्हैयालाल रेसिडेन्सी, काप कणेरी,
भिवंडी, जि. ठाणे सही/-
वेळ:- स. १० ते संध्या. ७. **ॲड. प्रशांत ज. जाधव**

### PUBLIC NOTICE

**NOTICE** is hereby given that we are investigating the right, title and interest of **(1) Mr. Sanjay Sartanbhai Desai** and **(2) Mr. Rajesh Sartanbhai Desai**, both residing at Jahal Krupa, Near Amrlal Society, Ghemarpura Road, Dhundhiyavadi, Palanpur, Banaskantha, Gujarat 385001 and **(3) Mrs. Champa Sartanbhai Desai**, residing at 313/5, Relan Bhavan, Plot No. 313, Road No. 12, Jawahar Nagar, Goregaon West, Mumbai 400104, who claim to be the owners of all that piece and parcel of land, admeasuring in aggregate 697.80 sq. mtrs. or thereabouts together with structures thereupon and more particularly described in the **Schedule** hereunder written (**"said Property"**).

All persons having any right, title, claim or interest in respect of the said Property mentioned herein below by way of sale, agreement for Sale, Development Agreement or rights, understanding, mortgage, purchase, exchange, transfer, assignment, charge, lease, license, lien, tenancy, release, relinquishment, inheritance, bequest, succession, gift, entitlement, easement, trust, maintenance, document, occupancy, possession, any arrangement, settlement, lis-pendens, attachment, award, judgement, decree or order or direction of any court of law or otherwise of whatsoever nature (collectively referred to as **"Claims"**), are hereby required to make the same known in writing, along with documentary evidence to the undersigned at office No. 7/B, Nadiadwala Market, Poddar Road, Malad (East), Mumbai - 400097 within 14 (fourteen) days from the date of publication hereof, failing which the Claims of such person/s, if any, will deemed to have been waived and/or abandoned for all intent and purpose.

**SCHEDULE OF THE SAID PROPERTY**

All that piece and parcel of land together with ground plus one upper floor structure standing thereon, bearing Survey No. 4, Hissa No. 1 (Part), corresponding to C.T.S. Nos. 38 and 38/1 to 24, admeasuring in aggregate 697.80 sq. mtrs. or thereabouts, situated at Revenue Village Kurar, together with structures occupied by tenants admeasuring 741.63 sq. mtrs. or thereabouts, assessed by the Municipal Corporation of Greater Mumbai under 'P' Ward bearing Municipal Assessment No. PN-E5210008, situate at Adambhai Chawl, also known as Bipin Chawl, Plot No. 16-A, Pushpa Park Road No. 2, Malad (East), Mumbai - 400097.

On or towards the North : By land Nalla
On or towards the South : By land bearing C.T.S. No. 36
On or towards the East : By land bearing C.T.S. No. 39
On or towards the West : By land bearing C.T.S. No. 37

**Mumbai**
**Dated: 25.05.2026**

RW
**Sd/-**
**R. B. Wadhwani**
**Advocate High Court**

### अनुसूची १
### फॉर्म ए
### जाहीर घोषणा

*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१७ चे नियम १४ अन्वये)*

**कोको नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशिल | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | **कोको नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना तारीख | १३.०४.२०१८ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक, पुणे |
| ४ | कॉर्पोरेट व्यक्तीचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U72900PN2018FTC176030 |
| ५ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | युनिट क्र. १५ए, ४ था मजला, ए विंग, सिटी व्हिस्टा खराडी, पुणे, महाराष्ट्र, भारत – ४११०१४ |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीची परिसमापन सुरू होण्याची तारीख | २१.०५.२०२६ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, नोंदणी क्र. | नाव - निधी अमित पोद्दार<br>पत्ता - नोंदणीकृत पत्ता - ७, अक्षत, विजय नगर, काटोल रोड, दुर्गा माता मंदिराजवळ, नागपूर-४४००१३.<br>संपर्क पत्ता -<br>३रा मजला, मीरा अपार्टमेंट्स, दुर्वा रेस्टॉरंटच्या वरती, यशवंत स्टेडियम समोर, धंतोली, नागपूर – ४४००१२<br>ईमेल - kokonpl.vl@gmail.com<br>संपर्क क्र.- +९१ ९३७३७ ९६०००<br>नोंदणी क्रमांक -<br>IBBI/IPA-001/IP-P-02829/2023-24/14381 |
| ८. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | २०.०६.२०२६<br>(कंपनी परिसमापन सुरू झाल्याच्या तारखेपासून तीस दिवस) |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **कोको नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड**ने दि.**२१.०५.२०२६** रोजी ऐच्छिक दिवाळखोरीची प्रक्रिया सुरू केली आहे.

**कोको नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या दाव्यांचा पुरावा, दिनांक **२०.०६.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी, बाब ७ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर परिसमापकाकडे सादर करावा.

वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करावेत. इतर सर्व भागधारक दाव्यांचे पुरावे प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करू शकतात.

खोटे किंवा दिशाभूल करणारे दाव्यांचे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

**निधी अमित पोद्दार**
**परिसमापक**
**दिनांक: २५.०५.२०२६**
**ठिकाण: नागपूर** **आयपी नोंद क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02829/2023-24/14381**

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# 'है जवानी'चा ट्रेलर लाँच



**दिग्दर्शक** डेव्हिड धवन आणि अभिनेता वरुण धवन यांची जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाली असून, त्यांच्या आगामी 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटाचा बहुप्रतिक्षित ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. हा चित्रपट संपूर्ण कौटुंबिक मनोरंजनाचा नजराणा घेऊन येत असून, यामध्ये डेव्हिड धवन यांच्या जुन्या काळातील विनोदी चित्रपटांची झलक पाहायला मिळणार आहे. या पिता-पुत्राच्या जोडीचा एकत्र असा हा चौथा चित्रपट आहे.

प्रदर्शित झालेल्या ट्रेलरवरून हा चित्रपट गोंधळ, गैरसमज, प्रेमाचा त्रिकोण आणि कौटुंबिक नाट्याने भरलेला असल्याचे स्पष्ट होते. या चित्रपटात वरुण धवनसोबत अभिनेत्री मृणाल ठाकूर आणि पूजा हेगडे पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत स्क्रीन शेअर करताना दिसत आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये रंगीबेरंगी पार्श्वभूमी, दमदार नृत्याविष्कार आणि खुसखुशीत संवाद पाहायला मिळतात, जे डेव्हिड धवन यांच्या दिग्दर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.

या चित्रपटाविषयी बोलताना दिग्दर्शक डेव्हिड धवन म्हणाले की, हा माझा ४६ वा चित्रपट असून, प्रेक्षकांचे मनोरंजन करणे हाच माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद आहे. या चित्रपटात विनोदासोबतच उत्तम गाणी आणि कौटुंबिक भावनांचा उत्तम मेळ साधण्यात आला आहे. चित्रपटात राकेश बेदी, चंकी पांडे, जिमी शेरगील, मौनी रॉय, राजेश कुमार आणि अली असगर यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट ५ जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# बॉबीचा चित्रीकरणातून ब्रेक



**अभिनेता** बॉबी देओल सध्या आपल्या कारकिर्दीतील एका अत्यंत वेगळ्या आणि यशस्वी टप्प्याचा अनुभव घेत आहे. 'ॲनिमल' चित्रपटातील त्याच्या मूक खलनायकाच्या भूमिकेनंतर इंटरनेटवर 'लॉर्ड बॉबी' म्हणून लोकप्रिय झालेल्या बॉबीने चित्रपटसृष्टीत एक विश्वासार्ह आणि क्रूर खलनायक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. आता तो एका नव्या, गडद आणि आव्हानात्मक भूमिकेसह प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज झाला आहे. त्याच्या 'बंदर' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तयारी सुरू झाली असून, या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी त्याने आपल्या लंडन येथील चालू चित्रीकरणातून (शूटिंग) तात्पुरता ब्रेक घेतला आहे आणि तो तातडीने भारतात परतला आहे. चित्रपटाच्या टीझर आणि ट्रेलरमधील त्याच्या लूकला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, त्याचा हा अंदाज अत्यंत आक्रमक, वास्तववादी आणि आजवर कधीही न पाहिलेला असा आहे.

या चित्रपटानंतर बॉबी यशराज फिल्म्सच्या स्पाय युनिव्हर्सअंतर्गत बनणाऱ्या 'अल्फा' या ॲक्शनपटात मुख्य खलनायकाच्या भूमिकेत दिसणार असून, यात आलिया भट्ट आणि शर्वरी मुख्य भूमिकेत आहेत. याशिवाय, ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवरील 'तीन कौवे' या गुप्तहेर थ्रिलर मालिकेतही तो सिद्धांत गुप्तासोबत एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# मातृकृपेबद्दल कृतज्ञ रुमा

**अभिनेत्री** रुमा शर्मा हिचा 'जीना दिल से' हा चित्रपट २९ मे रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेल्या एका मुलाखतीत रुमा शर्मा हिने दिल्ली सोडून मुंबईत आल्यानंतरचा आपला प्रवास आणि संघर्षाबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला. रुमा म्हणते की, हा चित्रपट कारकिर्दीचा एक महत्त्वाचा भाग बनेल, असे मी कधीही पूर्वनियोजित केले नव्हते. कोणत्याही ऑडिशन किंवा लुक टेस्टशिवाय केवळ एका अनपेक्षित फोन कॉलमुळे माझी या चित्रपटात निवड झाली. चित्रीकरणाच्या अगदी शेवटच्या टप्प्यात मी दुसऱ्या एका कलाकाराची जागा घेतली. इंडस्ट्रीत अशा प्रकारे कलाकार बदलणे ही सामान्य बाब असून, मी परिस्थितीवर लक्ष केंद्रित न करता मिळालेल्या संधीचे सोने करण्याला प्राधान्य दिले असे ती सांगते.



रुमा शर्माने तिच्या अभिनय प्रवासाचे संपूर्ण श्रेय तिच्या आईला दिले आहे. तिच्या आईचे स्वतःचे एक मोठे पडद्यावर झळकण्याचे स्वप्न होते. परंतु त्या काळात तिला आवश्यक पाठिंबा मिळू शकला नाही. त्यामुळे तिने स्वतःचे स्वप्न रुमाच्या माध्यमातून जगण्याचे ठरवले. आईने नोकरी सोडून एक मोठा त्याग केला आणि त्या दोन्ही दिल्लीहून मुंबईला स्थलांतरित झाल्या. मुंबईत आता त्यांना जवळपास दहा वर्षे पूर्ण झाली असून, ही वर्षे प्रचंड संघर्ष, नवीन गोष्टी शिकणे आणि शून्यातून आयुष्य पुन्हा उभे करण्यात गेली आहेत. रुमाने टेलिव्हिजन, डिजिटल प्लॅटफॉर्म, 'टेम्प्टेशन आयर्लंड इंडिया' सारखे रिॲलिटी शो आणि 'हनी ट्रॅप' सारख्या वेब सीरिजच्या माध्यमातून मनोरंजन विश्वात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज मी ज्या स्थानावर आहे, ते केवळ आईच्या विश्वास आणि पाठिंब्यामुळेच शक्य झाले असल्याचे तिने कृतज्ञतेने नमूद केले.

# 'पेड्डी'वर चालली सेन्सॉरची कात्री

**केंद्रीय** चित्रपट प्रमाणन मंडळाने म्हणजेच सीबीएफसीने दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'पेड्डी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाला यु/ए १६+ प्रमाणपत्र दिले आहे. प्रदर्शित होण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटातील काही आक्षेपार्ह शब्दांवर सेन्सॉरने आक्षेप घेतला असून, यामध्ये लौडेश, बोक्का, लम्बडी कोडाका, मदर चोद, दोंगामुंडा कोडाका आणि काल्ची पडी देंगुता या शब्दांना म्यूट किंवा बदलण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच चित्रपटातील चिकिरी चिकिरी या गाण्यातील सरुकू सामान या शब्दांमध्ये बदल करण्यास सांगण्यात आले आहे. यासोबतच चित्रपटाच्या उत्तरार्धातील राजस्थान हा शब्द आणि एका विशिष्ट समुदायाचा संदर्भ पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे.


एका दृश्यातील मिडल फिंगर दाखवण्याचा भाग संगणकीय ग्राफिक्सच्या सहाय्याने झाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सेन्सॉर प्रमाणपत्रावर नोंदवल्यानुसार या चित्रपटाचा एकूण कालावधी १८९ मिनिटे म्हणजेच ३ तास ९ मिनिटे इतका आहे. हा चित्रपट ४ जून रोजी आयमॅक्स स्वरूपातही प्रदर्शित होणार आहे.



# 'रामायण' येणार दिवाळीपूर्वीच!


**सध्या** विविध चित्रपटांच्या प्रदर्शनाच्या तारखा पुढे ढकलल्या जात असताना निर्माते नमित मल्होत्रा यांनी बहुप्रतिक्षित 'रामायण' हा चित्रपट लवकर प्रदर्शित करण्याचे ठरवले आहे. सुरुवातीला दिवाळी २०२६ मध्ये प्रदर्शित होणार असे जाहीर करण्यात आले होते. मात्र आता तो दिवाळीच्या एक आठवडा आधी म्हणजेच ३० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित करण्याचा विचार करत आहेत. मल्होत्रा यांना हा चित्रपट दिवाळीच्या मुख्य सुट्ट्या सुरू होण्यापूर्वीच चित्रपटगृहात स्थिरावू द्यायचा आहे.

दिवाळीपूर्वी चित्रपट प्रदर्शित केल्यास लोकांच्या सकारात्मक प्रतिक्रिया सर्वदूर पसरतील आणि त्याचा खरा फायदा दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये म्हणजेच दुसऱ्या आठवड्यात चित्रपट व्यवसायाला होईल, असा त्यांचा अंदाज आहे. या मास्टरस्ट्रोकमुळे चित्रपटाची कमाई पहिल्या आठवड्यापेक्षा दुसऱ्या आठवड्यात अधिक होऊ शकते. याबाबत सध्या चर्चा सुरू असून, लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल. या महाकाव्याचा दुसरा भाग पहिल्या भागाच्या बरोबर एक वर्षाने म्हणजेच दिवाळी २०२७ मध्ये प्रदर्शित करण्याचे नियोजन आहे.



# हेल्दी Me

# तोंडातील फोडांकडे दुर्लक्ष करताय?



तोंडातील एखादी लहानशी जखम किंवा फोड (अल्सर) हे सहसा किरकोळ दुखापत, आहारातील बदल किंवा तात्पुरत्या उष्णतेमुळे असू शकतात. अनेकदा अशा जखमा काही दिवसांत आपोआप भरून येतात. मात्र, हा फोड किंवा चट्टा दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ तसाच राहिला, तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. वैद्यकीय निरीक्षणांनुसार, ओरल कॅन्सरची अनेक प्रकरणे ही सुरुवातीला साध्या वाटणाऱ्या, पण बराच काळ न भरणाऱ्या जखमांमुळेच बळावलेली दिसतात.

अनेक रुग्ण तोंडातील जखमेकडे सुरुवातीला दुर्लक्ष करतात. जेव्हा ते डॉक्टरांचा सल्ला घेतात, तेव्हा आजार पहिल्या टप्प्याच्या पलीकडे गेलेला असतो. वास्तविक, वेळेवर निदान होणे आणि उपचाराचा परिणाम यांचा थेट संबंध असतो. सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास तोंडाचा कर्करोग मर्यादित शस्त्रक्रिया किंवा उपचारांनी बरा होऊ शकतो. याउलट, आजार बळावल्यावर तो ऊती (टिश्यूज), मानेतील लसिका ग्रंथी (लिम्फ नोड्स) आणि हाडांपर्यंत पसरतो. यामुळे उपचार अधिक गुंतागुंतीचे आणि प्रदीर्घ होतात. ओरल कॅन्सरसाठी काही प्रस्थापित घटक कारणीभूत ठरतात. यामध्ये तंबाखूचे सेवन, मद्यपान आणि ह्युमन पॅपिलोमा व्हायरसचा (एचपीव्ही) संसर्ग यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त, तोंडाची अस्वच्छता, पोषक तत्वांची कमतरता आणि तोंडात वारंवार होणारी जळजळ किंवा घर्षण यामुळेही कर्करोगाचा धोका वाढतो.

मुक कर्करोगाचे एक मोठे आव्हान म्हणजे सुरुवातीच्या जखमा अनेकदा वेदनारहित असतात. दुखत नसल्यामुळे रुग्ण त्याकडे दुर्लक्ष करतो. वास्तविक, लक्षणे दोन आठवड्यांहून अधिक काळ राहिल्यास त्वरित डॉक्टरांकडे जाणे गरजेचे असते.

जर या जखमेवर वेळीच उपचार केले नाहीत, तर ती आजूबाजूच्या स्नायू आणि हाडांवर आक्रमण करते. पुढील टप्प्यात हा कर्करोग मानेतील ग्रंथींमध्ये पसरतो आणि नंतर शरीराच्या इतर भागांतही जाऊ शकतो. यामुळे केवळ जगण्याची शक्यता कमी होत नाही, तर दैनंदिन शारीरिक कार्यांवरही (गिळणे, बोलणे, चघळणे) मर्यादा येतात. सबब, तोंडातील कोणतीही जखम १४ दिवसांपेक्षा जास्त काळ टिकली, तर तज्ज्ञ डॉक्टरांकडून किंवा दंतवैद्याकडून तिची तपासणी करून घ्यावी. तंबाखू आणि मद्यपानापासून दूर राहणे हा कर्करोगाचा धोका कमी करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जे लोक तंबाखू किंवा इतर जोखीम असलेल्या घटकांच्या संपर्कात आहेत, त्यांनी वेळोवेळी तोंडाची तपासणी करून घेणे हिताचे असते.

## लक्षणे कोणती?

१. न भरणारी तोंडातील जखम किंवा फोड.
२. जिभेवर किंवा तोंडाच्या आतील बाजूस असलेले पांढरे किंवा लाल चट्टे.
३. तोंडात निर्माण झालेली गाठ किंवा कडकपणा जाणवणे.
४. कारणाशिवाय होणारा रक्तस्राव.
५. गिळताना त्रास होणे किंवा आवाजात बदल होणे.

## हेल्दी टिप्स

*अंजीर उन्हाळा व पावसाळा दोन्ही ऋतूत येतात. उन्हाळ्यात येणारे अंजीर गोड असते. अंजीरातून शरीराला लोह, व्हिटॅमिन्स ए, बी, सी बऱ्याच प्रमाणात मिळतात. तसेच शर्करा भरपूर प्रमाणात मिळते. अंजीर खायला थंड व पचायला जड असते. यांच्या सेवनाने गॅसेसची तक्रार दूर होते. तसेच पित्तविकार, रक्तविकार व वातविकार यातील औषधी गुणधर्मामुळे दूर होतात.*

*अपचन, ॲसिडीटी, गॅसेसचा त्रास होणाऱ्या व्यक्तींनी दररोज सकाळ, संध्याकाळ १ ते २ अंजीर खावीत किंवा याचा रस प्यावा. वरील त्रासापासून आराम मिळेल. अंजीर खाल्ल्यानी बौध्दिक व शारीरिक थकवा दूर होण्यास मदत होते. लघवीचा त्रास होत असल्यास दिवसातून तीन ते चार अंजीर नियमितपणे खावीत. यामुळे मूत्रविकार दूर होतात. अशक्त व्यक्तींनी अंजिराचे रस अथवा अंजीर खाल्ल्याने अशक्तपणा दूर होतो. त्वचा विकार, त्वचेची आग होणे व कांजण्या या आजारात आराम पडण्यासाठी अंजीर खावीत.*



# ग्लुकोज पातळी आणि मेंदूचे आरोग्य

रक्तातील ग्लुकोज कमी झाल्यावर त्याचा थेट परिणाम मेंदूवर होतो. कारण मेंदूला ऊर्जेसाठी प्रामुख्याने ग्लुकोजची गरज असते आणि मेंदू स्वतः ग्लुकोज साठवून ठेवू शकत नाही.

## मेंदूसाठी ग्लुकोज का महत्त्वाचे आहे?

मानवी मेंदूचे वजन शरीराच्या एकूण वजनाच्या केवळ दोन टक्के असले, तरी शरीरातील एकूण ग्लुकोजच्या पुरवठ्यापैकी सुमारे वीस टक्के भाग मेंदू वापरतो. न्यूयॉर्क ॲकॅडमी ऑफ सायन्सेसच्या एका संशोधनानुसार, चेतापेशींच्या कार्यासाठी ग्लुकोज अत्यंत आवश्यक असते. शरीरातील साखरेची पातळी थोडी जरी खालावली, तरी मेंदूच्या कामावर परिणाम होऊन चिडचिड, गोंधळलेली अवस्था किंवा बोलताना शब्द अडखळणे अशा समस्या सुरू होतात. स्नायू किंवा यकृताप्रमाणे मेंदूकडे साखरेचा राखीव साठा नसल्याने तो या बदलांबाबत अत्यंत संवेदनशील असतो.



कमी रक्तशर्करा असलेल्या रुग्णांमध्ये सुरुवातीला अशक्तपणा, जास्त घाम येणे, अचानक भूक लागणे आणि हृदयाचे ठोके वाढणे अशी लक्षणे दिसतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास दृष्टी धूसर होणे, डोकेदुखी आणि एकाग्रता साधण्यास अडचण येणे असे त्रास उद्भवतात. गंभीर परिस्थितीत फिट्स येणे किंवा बेशुद्ध पडण्याची शक्यता असते. अशा वेळी तातडीने वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक ठरते.

वेळेवर जेवण न घेणे हे हायपोग्लायसेमियाचे सर्वात मुख्य कारण आहे. याशिवाय अतिप्रमाणात रिफाईंड कार्बोहायड्रेट्सचे सेवन केल्याने साखर एकदम वाढून पुन्हा झपाट्याने कमी होते. मधुमेही व्यक्तींमध्ये इन्सुलिनच्या चुकीच्या प्रमाणामुळे हा त्रास होऊ शकतो. मात्र, तणाव, अपुरी झोप किंवा विशिष्ट आजारांमुळे मधुमेही नसलेल्या व्यक्तींनाही रक्तातील साखर कमी होण्याचा त्रास होऊ शकतो.

## तातडीचे उपाय आणि प्रतिबंध

रक्तातील साखर कमी झाल्याचे जाणवले, तर त्वरित १५ ग्रॅम ग्लुकोज पावडर, फळांचा रस किंवा साखर खाणे फायदेशीर ठरते. रक्तातील साखर स्थिर झाल्यावर प्रथिने आणि कर्बोदकेयुक्त आहार घ्यावा.

# एसीचा वापर आणि आरोग्य



कडाक्याच्या उन्हाळ्यात एसीचे तापमान २५ ते २८ अंश सेल्सिअसच्या दरम्यान ठेवणे आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठीही आदर्श मानले जाते. जेव्हा आपण खोलीचे तापमान १८ किंवा २० अंशांपर्यंत खाली आणतो, तेव्हा बाहेरील अतिउष्ण तापमान आणि खोलीतील अतिथंड तापमान यामध्ये मोठी तफावत निर्माण होते. अशा परिस्थितीत जेव्हा एखादी व्यक्ती थंड खोलीतून अचानक बाहेरच्या उष्ण वातावरणात जाते किंवा बाहेरून आत येते, तेव्हा शरीराच्या तापमान नियंत्रण यंत्रणेवर (थर्मोरेग्युलेशन) मोठा ताण येतो. यामुळे डोकेदुखी, चक्कर येणे किंवा स्नायूंमध्ये कडकपणा जाणवू शकतो.

अतिथंड वातावरणात दीर्घकाळ राहिल्याने श्वासोच्छ्वासाचे विकार, सांधेदुखी आणि कोरड्या त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. विशेषतः ज्यांना दमा किंवा सायनसचा त्रास आहे, त्यांच्यासाठी अतिथंड हवा घातक ठरू शकते. वातानुकूलित यंत्रणेमुळे हवेतील आर्द्रता कमी होते. यामुळे डोळे आणि घसा कोरडा पडतो. या त्रासापासून वाचण्यासाठी 'एसी' सुरू असताना खोलीत पाण्याचे छोटे भांडे ठेवावे, जेणेकरून हवेतील ओलावा टिकून राहील.

यसाका लिक्वीड औषधी
यात आहे हळद आणि गुळवेल जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करते
कारले, जांभूळ, कडुलिंब इत्यादि १२ वनौषधींचे सुयोग्य आयुर्वेदिक मिश्रण
• ग्लुकोज मेटॅबॉलिजममध्ये मदत होते,
• थकवा कमी करते • पचनक्रिया सुधारते
• प्रतिकार शक्ती वाढवते • रक्त शुध्द करते
• जखम बरी होण्यास मदत करते
To Order Scan Here
A quality product from Simandhar
HELPLINE NO.: 7045355632

# स्नायू दोषांनी त्रस्त आहात?


रोज सकाळी सूर्यनमस्कार घातल्यास शरीराच्या बऱ्याचशा तक्रारी कमी होतात. आपण विविध प्रकारची कामे करतो तेव्हा त्यातल्या कोणत्या तरी कामामुळे आपल्या स्नायूवर मर्यादेपेक्षा अधिक भार पडतो आणि परिणामी तो स्नायू दुखावला तरी जातो किंवा आखडतो. विशेषतः शरीराला न मानवणारा व्यायाम करणे, मर्यादेपेक्षा अधिक वजन उचलण्याचा प्रयत्न करणे, मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेणे किंवा पर्वतावर चढण्याचा प्रयत्न करणे यातून स्नायूवर भार पडतो. अशावेळी खालील प्रकारचे उपाय योजावेत. म्हणजे औषधे न घेताच स्नायूंचे दुखणे कमी होऊ शकते.

स्नायू दुखत असतील तर आपल्या घराच्या आसपास किंवा एखाद्या मोकळ्या मैदानावर फिरावे. स्नायू दुखावल्यामुळे आराम करावासा वाटतो. पण तसा आराम टाळून थोडेसे तरी फिरणे आवश्यक आहे. त्यामुळे रक्तप्रवाह वेगाने सुरू होतो आणि दुखणाऱ्या स्नायूचे दुखणे थांबते. स्नायूच्या दुखण्यवर दुसरा उपाय म्हणजे मालिश करणे. योग्य पद्धतीने आणि योग्य दिशेने मसाज केला म्हणजे स्नायूचे दुखणे कमी होते. मसाज केल्याने रक्तप्रवाह तर सुधारतोच. परंतु आखडलेले स्नायू सरळ होतात.

आपल्या शरीरामध्ये खाल्लेल्या अन्नाचे ग्लुकोजमध्ये रुपांतर होते आणि ही ग्लुकोज नावाची शर्करा शरीराला ऊर्जा प्रदान करते. परंतु ग्लुकोज तयार करण्याच्या प्रक्रियेत काही वेळा बाधा येते किंवा पुरेसे ग्लुकोज तयार होत नाही. त्यामुळे स्नायू दुखायला लागल्यावर प्रथिनयुक्त अन्नपदार्थ खावेत. त्यामध्ये मांस, मासे, दूध आणि शेंगदाण्यासारखे द्विदल अन्न पदार्थ असावेत. स्नायूच्या आखडण्यावर एक चांगला उपाय म्हणजे दुखावलेल्या स्नायूंना थोडासा ताण देणे. एक सोपा उपाय म्हणजे भरपूर पाणी पिणे, व्यायाम करण्याच्या आधी, व्यायामाच्या मध्ये आणि व्यायामानंतर भरपूर पाणी प्यायले पाहिजे.



# नवाकाळ शब्दकोडे-१६१६



**आडवे शब्द –**

२. शंका, संशय, परंतु ४. ताबा, वर्चस्व ६. ललाट ८. ऐक्यभावना ११. परवानगी, अनुमती १२. एक अधिक पाव १४. पावसाची झड १६. बदनामी, निंदा १७. तुच्छतेची वागणूक देणे २१. पिच्छा २२. कलेला दाद देणारे जाणकार २४. नोकर २५. कंबर २६. धनुष्य २८. संन्याशाचे वस्त्र ३१. नकली ३४. जशास तसे वागून साधलेली बरोबरी ३६. थापाड्या ३८. सरकारी टॅक्स ३९. शिल्लक ४०. निर्धन ४१. उदयोन्मुख कवी ४४. लिंबाची एक जात ४५. रोग, दुखणे ४६. शरीर ४७. चोप ४८. अधोगती, पाताळ ५०. कमी वेळात ५२. चक्र ५३. युद्धभूमी ५४. नारळ ५५. हौदा ५६. डोंगरमाथ्यावरील सपाट जमीन ५७. उलट ५९. स्तुतिपाठक ६०. कवितेचा लोकप्रिय प्रकार ६१. ख्रिस्ती भिक्षुणी ६२. जाळे विणणारा कीटक ६३. तनू ६४. जबाबदारी, स्वीकार ६६. जमीन ६७. अवस्था ६८. जास्त वजनाचे ६९. प्रकट ७०. निर्विवाद ७२. आठवड्याचा सातवा अंश ७३. हरणांची ही जात पिकांचे नुकसान करते ७४. निर्दय ७७. नूतन ७८. अंत, मर्यादा ७९. या बाजूला, अलीकडे ८०. बारीक तुकडा, अंश ८१. शर्त ८३. हाक ८६. रुधिर ८७. आठ दिशांच्या देवता ८९. ढगांमुळे दाटून आलेली अंधारी ९१. किंचित अंश ९३. मासे पकडण्याचे जाळे ९५. रामाच्या जन्माची तिथी ९६. मृदुता ९७. रंक ९८. घ्राणेंद्रिय ९९. प्रत्येक १०१. सगळे १०२. युद्ध १०४. श्वसनसंस्थेचा दुर्धर आजार १०५. पशू १०६. खाज १०७. पारा १०८. म्लान, निस्तेज

**उभे शब्द –**

१. बोलताना नाकातून केलेला उच्चार ३. माणूसघाणी, स्वभावाने तिरकस ५. कपर्दिक ६. वाळवी ७. उपवास ९. कोपरा १०. सरपटणारा किळसवाणा प्राणी १३. गंध १५. वांती १८. लड्डू १९. नेहमी २०. कौशल्य २३. निर्धन २५. कारस्थान २६. लता मंगेशकर यांच्या आवाजातील कवि बी यांची प्रसिद्ध कविता 'चाफा बोलेना, चाफा चालेना….' २७. लगेच २९. हडकुळा ३०. चार चार ओळींमध्ये असणारी कविता ३२. अमान्य ३३. आशीर्वाद, दैवी देणगी ३४. काळजी, तमा ३५. या देशाचे जुने नाव ब्रह्मदेश होते ३७. किचकट भाषेतले व दुर्बोध, समजण्यास अवघड ३९. खरेदी-विक्रीचा जागा ४२. चौरस शाकाहारी जेवणातले दोन मुख्य पदार्थ ४३. पराक्रमाचे स्फुरण ४५. संख्यादर्शक चिन्ह, संख्या ४९. यश ५१. वस्त्र ५२. धनुष्य ५५. मारुतीची आई ५७. पूर्वी अधिक वापरात असणारे भाजी चिरण्याचे साधन ५८. सज्ज ५९अ. एकाग्र नजर ६०. ओला हिरवा चारा ६१. धुंदी, कैफ ६२. निगरगट्ट ६४. पापणी (हिंदी) ६५. भरड, जाडसर पीठ ६६. खूप ६७. दार ६८. पावसाळी ढग ७१. औदार्य ७२. वायू ७५. घाऊक ७६. कडक उन्हाचा त्रास ७८. कौशल्य ८१. आठवी तिथी ८२. समय ८४. स्वार्थासाठी पक्ष बदलणारा ८५. डुक्कर ८७. आज्ञाभंग ८८. अंदाजे ८९. धन, वित्त ९०. वरीच्या तांदळाचा उपवासाचा भात ९२. ज्याच्या नावाने वर्षगणना चालते अशा राजाची उपाधी ९४. शस्त्राची मूठ १००. ईश्वर १०१. मेव्हणीचा पती १०३. माज १०४अ. सामान •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१५ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. आपमतलबी ५. मल्लीनाथी ७. अरण्यरुदन १२. सण १३. जमीन १५. मनुज १६. कालव १७. नवार १९. बिकट २१. मोतद्दार २२. अन्यत्र २३. बिघा २४. रसद २५. छान २६. तणावग्रस्त २८. नकार ३१. वाव ३२. फलित ३४. चालक ३६. लगत ३८. अनाथ ४१. कोलाहल ४२. डरावडराव ४४. हीरक-महोत्सव ४५. नाखवा ४७. फासळ्या ५२. परंपरा ५६. पायाभूत ५७. हयगय ६०. घडामोड ६१. रहस्य ६३. लवलेश ६४. अतएव ६६. सतत ६८. यमन ७०. टारफुला ७१. हाक ७२. यमल ७३. सुत ७४. पालट ७६. मनन ७९. दैव ८१. कोंबडा ८३. अनवरत ८६. दारुडा ८८. प्रशस्त ९०. सटवाई ९१. जरासंध ९४. वक्रोक्ती ९५. शिवी ९६. धीर ९७. परीटघडीचा ९८. चेला ९९. अराजक

**उभे शब्द** : १. आसन २. पण वाकणार नाही ३. तट्टू ४. बीज ५. मन ६. नायक ७. अनुमोदन ८. रजत ९. रुकार १०. दल ११. नवरानवरी १४. मीन १८. संन्यस्त १९. बिघाड २०. टरफल २२. अग्रणी २५. छावा २७. होलिकोत्सव २९. कालवड ३०. रगड ३३. तलाव ३४. चालना ३५. कडवा ३७. तराफा ३९. थरकाप ४०. अंमळ ४३. वसन ४६. खडतर ४८. तूप ४९. अयाचित ५०. रहस्यमय ५१. जंगल ५३. रंगीत ५४. राघव ५५. नामोहरम ५८. यवस ५९. नाशवंत ६२. हय ६४. अस्थी ६५. एकलकोंडा ६६. सलाम ६७. तहान ६९. नमस्कार ७३. सुवर्णसंधी ७५. टब ७७. नशा ७८. कनवाळू ८०. निंदा ८२. वंश ८३. अट ८४. वई ८५. तजवीज ८७. रुपेरी ८८. प्रत्यंचा ८९. स्तवन ९०. सक्तीचे ९२. धरण ९३. मेघ ९५. शिरा

## अनुसूचित जाती एकता समितीचा मोर्चा
## २६ जूनला मंत्रालयावर धडकणार

■ छत्रपती संभाजीनगर

**अनुसूचित** जाती एकता समितीची राज्यव्यापी बैठक आज छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली. राज्यातील विविध सामाजिक संघटना, आंबेडकरी संघटना, कर्मचारी संघटना, राजकीय पक्ष तसेच युवक प्रतिनिधींनी या बैठकीत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सामाजिक न्याय, आरक्षण आणि संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. बैठकीत सर्वानुमते बीड ते मुंबई लाँग मार्च काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

हा लाँग मार्च १० जून २०२६ रोजी बीड शहरातून सुरू होणार असून, २६ जून २०२६ रोजी मुंबईत दाखल होणार आहे. त्यानंतर मुंबईतील आझाद मैदानावर दहा लाख लोकांच्या उपस्थितीत भव्य जाहीर सभा घेऊन आंदोलनाचा समारोप करण्यात येणार आहे. बैठकीत अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरण तत्काळ रद्द करणे, पदोन्नतीमधील आरक्षण लागू करणे आणि संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राज्यव्यापी जनआंदोलन उभारण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

## ज्ञानेश्वर माऊलींच्या दानपेटीत
## चोरी करणारा सेवेकरी अटकेत



■ आळंदी

**देवाच्या** आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात भाविकांनी दान केलेल्या रकमेत फेरफार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंदिर प्रशासनाच्या विश्वासाला तडा देत, पैसे गोळा करणाऱ्या विशाल बाळू वारूळे (३३) या सेवेकऱ्यानेच दानपेटीतील पैशांवर डल्ला मारला असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

पोलिसांनी अटक केलेला सेवेकरी विशाल वारूळे हा जुन्नर तालुक्यातील वारुळेवाडी येथील रहिवासी आहे. त्याने सेवेकरी म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त करून मंदिराच्या भोजनालयात काम मिळवले होते. वर्षभरापूर्वी आलेल्या विशालने प्रामाणिकपणा दाखवत कॅशिअरच्या मनात स्वतःबद्दल विश्वास निर्माण केला होता. त्यामुळे तीन महिन्यांपूर्वी कॅशिअरने त्याला दानपेटीतील रक्कम जमा करण्याच्या कामात दाखल करून घेतले होते. परंतु काही दिवसातच त्याने चोरी करण्याचे काम सुरू केले होते. दानपेटीतील रक्कम बादलीत भरता-भरता तो काही रक्कम पिशवीत भरू लागला. कॅशिअरकडे बादली सोपवणे आणि सर्व रक्कम जमा करून होईपर्यंत तो पिशवीत भरलेली रक्कम घरी घेऊन जायचा. पिशवीत वरती यासाठी मंदिरातील हार असल्याने कुणाला त्याचा संशय येत नव्हता. परंतु तीन-चार दिवसांपूर्वी मात्र सीसीटीव्हीच्या स्क्रिनसमोर बसलेल्या कर्मचाऱ्याला त्याच्या हालचालींवरील संशय आला. मग त्याने दोन दिवस निरखून पाहिले, ही बाब देवस्थानच्या कानावर घातली. त्यातूनच खरा प्रकार उघडकीस आला आणि पोलिसांनी त्यांच्या घरातील पावणे तीन लाख रुपयांसह त्याला अटक केली.

## वेंगुर्ला-शिरोडा किनाऱ्यावर
## मच्छीमारांची बोट उलटली

**एक जण बेपत्ता**

■ सिंधुदुर्ग

**वेंगुर्ला** तालुक्यातील शिरोडा किनाऱ्याजवळ आज पहाटे समुद्रात मच्छीमारी बोट उलटली. या अपघातात एकाच कुटुंबातील तीन मच्छीमार समुद्रात अडकले होते. त्यापैकी दोघांना सुखरूप वाचवण्यात यश आले असून, एकजण बेपत्ता आहे.

बेपत्ता मच्छीमाराचे नाव राजन सारंग असून, त्यांचा शोध सुरू आहे. सारंग कुटुंबातील तिघेजण नेहमीप्रमाणे पहाटे मासेमारीसाठी समुद्रात गेले होते. मात्र अचानक हवामानात बदल होऊन सोसाट्याचा वारा सुटला आणि जोरदार पावसासह समुद्रात मोठ्या लाटा उसळल्या. या प्रतिकूल परिस्थितीत बोटीवरील नियंत्रण सुटल्याने बोट समुद्रात उलटली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील इतर मच्छीमार आणि स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. यामध्ये तिघांपैकी दोघांना वाचवण्यात यश आले. मात्र राजन सारंग लाटांमध्ये बेपत्ता झाले. स्थानिक मच्छीमार, जीवरक्षक आणि प्रशासनाच्या मदतीने बेपत्ता व्यक्तीचा शोध सुरू आहे. मात्र खराब हवामान आणि खवळलेल्या समुद्रामुळे शोधमोहिमेला अडथळे येत होते.

## श्रीकांत शिंदेंसह महाराष्ट्रातील ५ खासदारांना संसद रत्न पुरस्कार

■ नवी दिल्ली

**यंदाच्या** संसद रत्न पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्राचे विशेष वर्चस्व आहे. यात महाराष्ट्रातील पाच खासदारांना संसद रत्न या बहुमानाने गौरवण्यात आले आहे. लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, डॉ. हेमंत विष्णू सावरा, पुण्याच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, जळगावच्या लोकसभा खासदार स्मिता उदय वाघ अशा पाच खासदारांचा समावेश आहे.

ज्युरी समितीने यंदाच्या पुरस्कारांसाठी १० लोकसभा खासदार, २ राज्यसभा खासदार आणि ४ संसदीय स्थायी समित्यांची निवड केली आहे. २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरपर्यंत संसदेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. देशभरातून जगदंबिका पाल (उत्तर प्रदेश), पी.पी. चौधरी (राजस्थान), निशिकांत दुबे (झारखंड) आणि डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे (महाराष्ट्र) हे वैयक्तिक श्रेणीत निवडलेल्या खासदारांची नावे आहेत. तसेच इतर निवडलेल्या खासदारांमध्ये प्रवीण पटेल (उत्तर प्रदेश), विद्युत बरन महतो (झारखंड), लुंबाराम चौधरी (राजस्थान), नरेश गणपत म्हस्के (महाराष्ट्र), डॉ. हेमंत विष्णू सावरा (महाराष्ट्र), स्मिता उदय वाघ (महाराष्ट्र), डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी (महाराष्ट्र), यांचा समावेश आहे. हे सर्व संसद सदस्य २०२६ च्या अर्थसंकल्पीय



अधिवेशनाच्या शेवटपर्यंत विविध श्रेणींमध्ये संसदेत त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखले जाते, असे प्रियदर्शनी राहुल यांनी सांगितले. चार संसदीय समित्यांनी त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कारही जिंकले आहेत. यामध्ये डॉ. चरणजितसिंग चन्नी यांच्या अध्यक्षतेखाली कृषी समिती, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखाली वित्त समिती, सप्तगिरी शंकर उलाका यांच्या अध्यक्षतेखालील ग्रामीण विकास आणि पंचायती राज समिती आणि कोळसा आणि खाण समिती अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. १६वा पुरस्कार सोहळा जुलै २०२६ मध्ये नवी दिल्ली येथे होणार असून, या कार्यक्रमादरम्यान १५०वा पुरस्कार प्रदान केला जाईल.

## विरार बोळींजच्या म्हाडा वसाहतीत
## पिण्याच्या पाण्याची बिकट समस्या

■ मुंबई

**विरार** (पश्चिम) बोळींज येथील म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींतून पिण्याच्या पाण्याची बिकट समस्या आहे. पालिकेकडून अपुरे व कमी दाबाने होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे रहिवाशांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

म्हाडा कोंकण गृह निर्माण मंडळाने सन २०१६ साली बोळींज येथे २३ मजली इमारती असलेल्या जवळपास सहा हजार घरांचा प्रकल्प उभा केला आहे. सन २०२३-२४ साली म्हाडाने पालिकेला अंदाजे ७६ कोटी रुपये रक्कम अदा करून या वसाहतीसाठी जलजोडणी घेतली आहे. असे असताना पुरेशा पाण्याअभावी अनेक रहिवाशांची तडफड सुरू असल्याची तक्रार आहे. कुणी पिण्याचे पाणी देते का? अशी ओरड काही इमारतीतून सुरू आहे. या संदर्भात म्हाडा कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. विशाल राठोड यांना विचारले असता ते म्हणाले, या वसाहतीसाठी परिसरात दोन जलतरण तलाव बांधण्याचे म्हाडाचे नियोजन पूर्वीपासून आहे. मात्र रहिवाशांच्या पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता येथे जलतरण तलाव न बांधता त्याऐवजी या खर्चातून वसाहतींसाठी दोन जलकुंभ बांधण्यात येणार आहेत. जेणेकरून येथील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची दूर होऊन रहिवाशांना मुबलक पाणी मिळेल.

## अखेर भुयारी मेट्रो मार्गिकेत
## मोबाईल सिग्नल मिळणार

■ मुंबई

**भुयारी** मेट्रो मार्गिका अर्थात मेट्रो-३ (ॲक्वा लाईन) मधील मोबाईल नेटवर्कचा प्रश्न अखेर मार्गी लागणार आहे. मुंबई मेट्रो रेल प्रशासनाने मेट्रो-३ मार्गिकेवर मोबाईल नेटवर्क सेवा सुरू करण्यासाठी आघाडीच्या दूरसंचार कंपन्यांना पायाभूत सुविधा उभारण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे लवकरच प्रवाशांना भुयारी मेट्रोतून प्रवास करतानाही मोबाईलवरून सहज संपर्क साधता येणार आहे. आरे-जेव्हीएलआर ते कफ परेडदरम्यान धावणाऱ्या भुयारी मेट्रोत मोबाईल नेटवर्क नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. संपूर्ण प्रवासादरम्यान मोबाईल सेवा खंडित होत असल्याने संपर्क साधणे अशक्य बनत होते.

## अमेरिका-इराणमध्ये अखेर शांतता करार होणार

पान १ वरून - तर इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई म्हणाले की, या टप्प्यावर लादलेले युद्ध संपवण्यावर आमचे लक्ष केंद्रित आहे. सर्वप्रथम १४ कलमे असलेल्या सामंजस्य करारावर सहमती होण्याचा मुद्दा आहे. ज्या मुद्यांवर चर्चा होत आहे, ते (लेबनॉनसह सर्व आघाड्यांवरील) युद्ध संपवण्यावर केंद्रित आहेत. अमेरिकेचे सागरी हल्ले, नौदल नाकेबंदी थांबवणे आणि इराणची गोठवलेली मालमत्ता सोडण्याशी संबंधित इतर मुद्दे हे प्रमुख विषयांपैकी आहेत. प्रस्तावित सामंजस्याचा भाग म्हणून होर्मुजची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यात येईल, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. परंतु इराणने ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावत म्हटले की, तेहरान होर्मुजवर आपले नियंत्रण कायम ठेवेल. इराणने केवळ ये-जा करणाऱ्या जहाजांची संख्या युद्धापूर्वीच्या पातळीवर परत आणण्यास परवानगी देण्याचे मान्य केले आहे. परंतु याचा अर्थ युद्धापूर्वी अस्तित्वात असलेल्या मुक्त वाहतूक पुन्हा सुरू करणे असा अजिबात नाही.

### ट्रम्प यांची गूढ पोस्ट

अमेरिका-इराणमध्ये करार अंतिम टप्प्यात आहे, असे सांगणाऱ्या ट्रम्प यांनी संध्याकाळी केलेल्या एका सोशल मीडिया पोस्टने सगळेच चक्रावून गेले. ट्रम्प यांनी या पोस्टमध्ये Adios (एडिओस) हा शब्द लिहून लिहून एक एआय-जनरेटेड छायाचित्र शेअर केले आहे. या चित्रात अमेरिकन विमानांद्वारे हवाई हल्ले होताना दाखवले आहेत. या चित्रात इराणचा झेंडाही दिसत आहे. या पोस्टचा राजनैतिक अर्थ काय, यावरून तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. मूळ स्पॅनिश शब्द असलेल्या Adios चा अर्थ निरोप घेणे असा होतो. तो अनौपचारिक आणि सहजपणे निरोप घेण्यासाठीही वापरला जातो.

## झोपडीधारकांच्या न्यायिक
## निर्णयासाठी 'एसआरए' आपल्या दारी

■ मुंबई

**मुंबईसह** उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाशांच्या न्यायिक निर्णयासाठी 'एसआरए' आपल्या दारी असे अभियान प्राधिकरणाने सुरू केले आहे. यामुळे झोपडीधारकांच्या सर्व शंका व तक्रारींचे जागीच निरसन होणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. झोपू योजना म्हटले की, विकासकाची मनमानी, हेळसांड थकीत भाडे, रखडलेले प्रकल्प अशा तक्रारी झोपडीधारकांच्या असतात. असे प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने 'एसआरए' आपल्या दारी अभियान सुरू केले आहे, अशी माहिती देऊन या कार्यालयातील अधिकारी पुढे म्हणाला, या अभियानात एसआरएचे अधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार कार्यकारी अभियंता, सोसायटी नोंदणी अधिकारी यांचा समावेश आहे.

## कॉकरोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट
## अभिजित दीपकेनेच बंद केल्याचा आरोप

पान १ वरून - किंवा डोमेन रजिस्ट्रारकडून घेतलेली कारवाई असू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. काही युजर्सनी आरोप केला की, आधी स्वतःच डीएनएस रेकॉर्ड हटवून वेबसाईट बंद केली आणि नंतर सरकार घाबरले आहे, असा दावा करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान, अभिजित दीपकेने दावा केला आहे की, त्याचे इंस्टाग्राम अकाऊंट पुन्हा मिळाले आहे. त्यांनी एक व्हिडिओ पोस्ट करत आम्ही परत आलो आहोत असे सांगितले. 'कॉकरोच जनता पार्टी'ला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पाठिंबा दिला आहे.

## कर्नाटकचा आंबा देवगड हापूस म्हणून विक्री! कारवाईची मागणी

■ सिंधुदुर्ग

**देवगड** हापूस आंब्याच्या नावाखाली कर्नाटकच्या आंब्यांची सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेली अनेक वर्षे विक्री होत आहे. यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रशासनाने यावर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करत त्यांनी शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होऊ देऊ नका, असा इशारा दिला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील कणकवली तालुक्यात स्टॉल उभारून कर्नाटकातून आणलेला आंबा 'देवगड हापूस' या नावाने विक्री केला जात असल्याचे समोर आले. सायंकाळच्या सुमारास काही नागरिक आणि स्थानिक बागायतदारांनी आंब्यांची पाहणी केली. त्यावेळी कर्नाटकातून आणलेला आंबा देवगड हापूस म्हणून विक्री होत असल्याचे उघड झाले. संतप्त नागरिकांनी हे आंबे महामार्गावर ओतून ग्राहक आणि पर्यटकांची फसवणूक करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

## विद्यार्थ्यांवर पाणी शिंपडत 'एम्स'ची हमी

पान १ वरून

आता मोटेगावकरचा कोचिंग व्यवसाय, कथित पेपर विक्री आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) देखील या प्रकरणात प्रवेश करत मालमत्ता आणि बँक व्यवहारांचा तपास सुरू केला आहे. तपासात मोटेगावकरने महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये कोट्यवधींची मालमत्ता खरेदी केल्याचा संशय आहे. पुण्यातील वारजे परिसरात घेतलेल्या जमिनीची किंमत ३० ते ४० कोटी रुपयांच्या घरात असल्याची माहिती आहे. दरम्यान, सहआरोपी मनिषा हवालदार हिने पुरावे नष्ट करण्यासाठी भौतिकशास्त्राच्या नोट्स जाळल्याचे आणि व्हॉट्सॲप चॅट डिलीट केल्याचेही तपासात उघड झाले आहे.

## फडणवीसांनंतर एकनाथ शिंदे
## रविशंकर यांच्या आश्रमात

पान १ वरून - जागावाटप आणि जागांची अदलाबदल यांच्याशी संबंधित असल्याचे म्हटले जात आहे. राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. महायुतीत जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास ठरल्याची माहिती आहे. त्यानुसार भाजपा १२, शिंदे गट ३ आणि अजित पवार गट २ जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र १ ते २ जागांवर अद्यापही मतभेद कायम आहेत. शिंदे गटाने ६ जागांची मागणी केली असून, भाजपाकडून ४ जागांची ऑफर दिली गेल्याचे समजते. त्यामुळे या मुद्यावर तोडगा काढण्यासाठीच शिंदे दिल्लीत गेल्याची शक्यता आहे.

ऑपरेशन टायगरवर या भेटीत चर्चा होईल काय? असाही प्रश्न या निमित्ताने चर्चिला जात आहे.

शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
अॅगमार्क
फोंडाघाट फार्मसी
मुंबई - १६. फोन : २४३० ८५४२

नवाकाळ
• मुंबई | सोमवार २५ मे, २०२६ • पान -८

## १ जूनपासून धान्य दळण महागणार

**पुणे -** वाढती महागाई, गिरणी साहित्याच्या दरातील वाढ आणि कामगारांच्या पगारवाढीच्या मागण्यांमुळे पुणे शहर जिल्हा पीठ गिरणी मालक संघाने धान्य दळणाच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. संघाच्या कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, नवीन दर १ जूनपासून लागू होणार आहेत. सध्या प्रति किलो ८ रुपये असलेला धान्य दळणाचा दर वाढवून १० रुपये करण्यात आला आहे. त्यामुळे ग्राहकांना आता प्रति किलो दळणासाठी २ रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. डाळ आणि भाजणी दळणासाठीचा प्रति किलो १५ रुपयांचा दर कायम ठेवण्यात आला आहे. वाढत्या खर्चामुळे दरवाढ अपरिहार्य असल्याचे संघाचे अध्यक्ष लुईस सांगळे आणि सचिव प्रकाश कर्डीले यांनी सांगितले. ग्राहकांनी या निर्णयाला सहकार्य करावे, असे आवाहनही संघाकडून करण्यात आले आहे.

## टीसीएस प्रकरणी नगरसेवक मतीन पटेलांना पोलिसाची नोटीस

■ नाशिक

**नाशिक** टीसीएस धर्मांतर आणि अत्याचार प्रकरणातील आरोपी निदा खानला आश्रय दिल्याप्रकरणी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांना नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेने नोटीस बजावली आहे. नोटीस मिळाल्यानंतर पटेल यांनी नरमाईची भूमिका घेतली असून, ते उद्या नाशिक पोलिसांसमोर हजर होणार असल्याची माहिती आहे.

या प्रकरणात देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात पटेल यांच्या विरोधात आरोपीला आश्रय दिल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी पथक छत्रपती संभाजीनगर येथे पाठवले होते. मात्र ते सापडले नव्हते. दरम्यान, न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर गुन्हे शाखेने त्यांना नोटीस बजावली. यापूर्वी या प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खानला अटक करताना पोलिसांनी मतीन पटेल यांची चौकशी केली होती. मात्र त्यावेळी गुन्हा नोंद नसल्याने त्यांना सोडण्यात आले होते. आता कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाईचा वेग वाढला आहे.

## कालिदास स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील कारवाईला स्थगिती! किरीट सोमय्यांना झटका

■ मुंबई

**मुलुंड** येथील कालिदास क्रीडा संकुलातील कथित अनधिकृत बांधकामावर आवश्यक कायदेशीर नोटीस न बजावता थेट बुलडोझर चालवणाऱ्या मुंबई महापालिकेला उच्च न्यायालयाने तीव्र शब्दांत फटकारले आहे. प्रशासन अशा प्रकारे स्वतःचा कायदा हातात घेऊ शकत नाही, अशा कडक शब्दांत न्यायालयाने पालिकेच्या मनमानी कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. योग्य कायदेशीर प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय कथित बेकायदेशीर बांधकामेसुद्धा पाडली जाऊ नयेत, असे न्यायालयाने पालिकेला बजावले. या निर्णयाने पालिकेबरोबरच घोटाळा झाल्याचा आरोप करीत मालमत्तेचे चित्रीकरण करणाऱ्या किरीट सोमय्या यांना मोठा झटका बसला आहे.



धनराज हॉस्पिटॅलिटीने दाखल केलेल्या याचिकेवर न्या. संदेश पाटील यांच्या सुट्टीकालीन खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील व्यंकटेश्वर धोंड यांच्यासह ॲड. नितेश भुतेकर आणि ॲड. डॉ. क्षितिजा वाडटकर यांनी बाजू मांडली. कालिदास क्रीडा संकुलाचा काही भाग कोणतीही पूर्वसूचना वा बाजू मांडण्याची संधी न देता तोडण्यात आला. कालिदास क्रीडा संकुलाची मालमत्ता पालिकेच्या मालकीची आहे. परंतु ती पालिकेने स्थापन केलेल्या एका सार्वजनिक ट्रस्टद्वारे सांभाळली जात असून संबंधित ट्रस्टचे अध्यक्ष महापौर आहेत, याकडे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी लक्ष वेधले. माजी खासदार किरीट सोमैया यांनी केलेल्या सार्वजनिक आरोपांनंतर पाडकाम कारवाई करण्यात आली.

## मध्य प्रदेशात सर्वात मोठा आंबा झाडांना व्हीव्हीआयपी सुरक्षा

■ भोपाळ

**मध्य** प्रदेशातील आलीराजपूर जिल्ह्यात एका विशिष्ट जातीच्या आंब्याच्या ९ झाडांच्या सुरक्षेसाठी ९ सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहेत. कारण हा आंबा हा जगातील सर्वात मोठा आणि महागडा आंबा म्हणून ओळखला जातो. आंब्यांच्या झाडांची ही व्हीव्हीआयपी सुरक्षा चर्चेचा विषय बनली आहे. या आंब्याचे नाव 'नूरजहां' असे आहे.



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या झाडाच्या एकेका आंब्याचे वजन २ ते ५ किलोपर्यंत असते. एका आंब्याची किंमत १५०० ते ३००० रुपये इतकी आहे. या खास आंब्यासाठी अगोदरच ॲडव्हान्स बुकिंग करावी लागते. मध्य प्रदेशातील आदिवासी बहुल आलीराजपूर जिल्ह्यातील जुना कट्ठीवाडा गावातील शिव आम फार्ममध्ये नूरजहां या आंब्याची लागवड केली जाते. फार्मचे संचालक किसान भरतराजसिंह जादव सांगतात की, नूरजहां या आंब्याचे मूळ अफगाणिस्तानातील आहे. या झाडाचे आयुष्य २० ते २५ वर्षे असते. आम्ही ग्राफिक तंत्राने ११ नवीन रोपे देखील तयार केली आहेत. या आंब्यांना जगातील सर्वात मोठा आंबा म्हणून ओळखले जाते. याचा आकर्षक रंग, सुगंध खूपच खास आणि चव एक मधूर असते. आखाती देशांसह अमेरिका, कॅनडा, युके येथील भारतीय लोकही हा आंबा पसंत करतात.




## सिद्धिविनायक मंदिराच्या कार्यक्रम पत्रिकेतून उपमहापौरांचे नाव गायब

■ मुंबई

**प्रभादेवी** येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मोठा निधी खर्च करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामाचे भूमिपूजन सोमवारी २५ मे रोजी होणार आहे. मात्र, या भूमिपूजन सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत मुंबईच्या उपमहापौरांचे नाव नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

भूमिपूजन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार असल्याचे निमंत्रण पत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. तसेच मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे आणि अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी उपस्थित राहणार असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. पालिकेच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पाच्या निमंत्रण पत्रिकेत शहराच्या प्रथम नागरिक असलेल्या महापौर रितू तावडे तसेच उपमहापौर संजय घाडी यांचा सुरुवातीला उल्लेख करण्यात आला नव्हता.

त्यामुळे पालिका आणि राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. समाजमाध्यमांवर पत्रिका व्हायरल झाल्यानंतर नवी पत्रिका प्रसिद्ध करण्यात आली. त्यामध्ये महापौर रितू तावडे यांच्या नावाचा समावेश करण्यात आला. उपमहापौर संजय घाडी यांचे नाव अद्यापही पत्रिकेत नसल्याने चर्चांना अधिक उधाण आले आहे.

## बिग बास्केटमध्ये परप्रांतीय मॅनेजरने मराठी डिलिव्हरी बॉयना काढले

■ बदलापूर

**बदलापूरमध्ये** बिग बास्केटमध्ये परप्रांतीय मॅनेजरने मराठी डिलिव्हरी बॉयना कामावरून कमी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. एका ऑर्डरसाठी मिळणारे ८० रुपये मानधन कमी करून केवळ १५ रुपये केल्याचाही आरोप डिलिव्हरी बॉयनी केला आहे. या निर्णयामुळे अनेक डिलिव्हरी बॉयवर बेरोजगारीची वेळ आल्याचा दावा करण्यात येत असून, त्यांनी आंदोलनही सुरू केले आहे. याचा व्हिडिओही व्हायरल झाला आहे.

या डिलिव्हरी बॉयनी सांगितले की, आमच्यावर अन्याय होत आहे. स्थानिक मराठी मुलांना कामावरून कमी करून बाहेरच्या लोकांना प्राधान्य दिले जात आहे. येथे नवीन परप्रांतीय मॅनेजर आले असून, त्यांनी आम्हाला कोणतेही ठोस कारण न देता कामावरून काढले. आमची विनंती आहे की आम्हाला लवकरात लवकर न्याय मिळावा. जोपर्यंत व्यवस्थापन आमच्याशी संवाद साधत नाही, तोपर्यंत आम्ही आंदोलन सुरू ठेवणार आहोत. संध्याकाळी ५ वाजता चर्चा होईल, असे आम्हाला सकाळी सांगितले.

## क्रीडा भवन जागेत पालिकेसाठी नवीन सुसज्ज सभागृह उभारणार

**भाजपाच्या हालचाली सुरू**

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या जुन्या व ब्रिटिशकालीन अपुऱ्या सभागृहामुळे पालिका मुख्यालयाजवळ असलेल्या क्रीडा भवनाच्या जागेवर नवीन प्रशस्त चार मजली सभागृह बांधले जाणार आहे. त्यासाठी भाजपाने पुढाकार घेत चाचपणी सुरू केली आहे.

यासंदर्भात पालिका प्रशासनाने क्रीडा भवन व परिसराची पाहणी केली. मात्र यामध्ये २५० नगरसेवक बसतील इतकीच आसन व्यवस्था करणे शक्य होणार आहे, असे पालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र क्रीडा भवनजवळ असलेली सरकारची ३ हजार चौरस मीटर जागा मिळाली तर हे सभागृह बांधण्यासाठी काहीच अडचण येणार नाही. मुंबई पालिकेत व राज्यात महायुतीचेच सरकार असल्याने मुख्यालयासमोरील राज्य सरकारची ही जागा मिळणे सहज शक्य आहे. या नवीन सभागृह जागेत ८० वाहनांची भूमिगत पार्किंग व्यवस्था, महापौरांसाठी स्वतंत्र लिफ्ट आदी सुविधा असणार आहेत. दरम्यान, सध्या पालिकेच्या दोन इमारती असून, एक हेरिटेज वास्तू आहे, तर एक सहा मजली नवीन इमारत आहे. या इमारतीच्या सहाव्या मजल्यावर प्रशस्त सभागृह साकारणे शक्य होणार आहे. तरी महायुतीच्या पालिकेतील नेत्यांनी सहाव्या मजल्यावर सभागृह उभारणे शक्य होईल का, याची पाहणी करावी, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

## वीजपुरवठा खंडित झाल्याने मध्य रेल्वेची सेवा विस्कळीत

■ मुंबई

**मध्यरेल्वेची** वाहतूक आज पहाटे विस्कळीत झाल्याने कसारा-कल्याण मार्गावरील प्रवाशांचे मोठे हाल झाले. आसनगाव ते खडवली स्थानकांदरम्यान अप मार्गावरील वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे लोकल सेवा तब्बल एक ते दीड तास ठप्प होती. त्यामुळे पहाटेच्या वेळी निघालेल्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. मध्य रेल्वेकडून दुरुस्तीच्या कामांसाठी रविवारी मेगा ब्लॉक घेण्यात आला होता. त्यातच अप मार्गावरील वीजपुरवठ्यात बिघाड झाल्याने कसारा-कल्याण मार्गावरील वाहतुकीला फटका बसला. पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास सुटलेली पहिली लोकल सुमारे पावणेपाच वाजता थांबली. त्यानंतर साडेपाच वाजूनही रेल्वे सेवा सुरळीत झाली नव्हती. वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ लागल्याने लोकल गाड्या जागोजागी खोळंबल्या. आज मेगाब्लॉकमुळे अनेक लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या.

## 'जेएसडब्ल्यू'च्या बीकेसी मुख्यालयाबाहेर आंदोलनास बच्चू कडूंना कोर्टाची बंदी

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड आणि जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लिमिटेड यांना अंतरिम दिलासा देत, आ. बच्चू कडूंच्या प्रहार संघटनेशी संबंधित कामगार संघटनेला वांद्रे-कुर्ला संकुल बीकेसी येथील कंपनीच्या मुख्यालयाजवळ आंदोलन करण्यास मनाई केली आहे.

या कंपन्यांनी प्रहार संघटना आणि बीकेसी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांविरोधात दाखल केलेल्या अंतरिम अर्जावर सुनावणी करताना सुट्टीकालीन न्या. संदीप पाटील यांनी हा निर्णय दिला. बच्चू कडू यांनी



स्थापन केलेल्या प्रहार संघटनेला बीकेसीतील जेएसडब्ल्यू सेंटरच्या ५०० मीटर परिसरात सभा, निदर्शने, घोषणाबाजी, धरणे किंवा आंदोलन करण्यास बंदी घालण्यात आली आहे. कर्मचारी, अभ्यागत आणि वाहनांच्या येण्या-जाण्यात अडथळा निर्माण करण्यासही मनाई करण्यात आली आहे. याचिकेनुसार संघटनेने २८ एप्रिल रोजी नोटीस बजावत १८ मेपासून कामगारांच्या काही प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. कंपन्यांनी असा युक्तिवाद केला की, प्रहार संघटना त्यांच्याशी संलग्न नसून ट्रेड युनियन्स ॲक्ट १९२६ अंतर्गत नोंदणीकृत कामगार संघटनाही नाही.

## बलुचिस्तानात ट्रेनवर हल्ला २३ जण ठार! ४७ जखमी

■ इस्लामाबाद

**बलुचिस्तान** प्रांतातील क्वेट्टा येथे पाकिस्तानी सैनिकांना घेऊन जाणाऱ्या ट्रेनला लक्ष्य करत बॉम्बस्फोट घडवण्यात आला. या स्फोटात किमान २३ पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला असून, ४७ हून अधिकजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्राथमिक माहितीनुसार हा आत्मघाती हल्ला असल्याचे सांगितले जात आहे. बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

रेल्वे ट्रॅकजवळ स्फोट घडवून धावत्या ट्रेनला लक्ष्य करण्यात आले. स्फोटाची तीव्रता इतकी होती की ट्रेनचा एक डबा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला, तर इंजिनासह तीन डबे रुळावरून घसरले आणि दोन डबे उलटले. स्फोटाचा आवाज दूरवर ऐकू आला आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर पोलीस, सुरक्षा दल आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. संपूर्ण परिसर सील करण्यात आला असून, जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. अनेक जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## चार महिलांचा बळी घेणारी वाघीण बेशुद्ध करून जेरबंद

**वनविभागाच्या शोधमोहिमेला यश**

■ चंद्रपूर

**दोन** दिवसांपूर्वी सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगल परिसरात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या चार महिलांचा बळी घेणाऱ्या नरभक्षक वाघिणीला अखेर वनविभागाने जेरबंद केले. पवनपार तलाव परिसरात विशेष पथकाने सापळा रचून वाघिणीला डार्ट मारून बेशुद्ध करून तिला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

चार महिलांचा बळी घेणाऱ्या या वाघिणीमुळे संपूर्ण जिल्ह्यात तिची दहशत निर्माण झाली होती. संतप्त ग्रामस्थांनी या वाघिणीला तत्काळ जेरबंद करण्याची मागणी केली होती.



या घटनेनंतर वनविभागाने संपूर्ण परिसरात मोठी शोधमोहीम सुरू केली. हल्ला करणारा वाघ वा वाघिण नेमका कोणती आहे, हे निश्चित करण्यासाठी गुंजेवाही जंगल परिसरात २० ट्रॅप कॅमेरे आणि ३ मोशन सेन्सर लाईट सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. तसेच विशेष पथकाद्वारे दिवस-रात्र गस्त वाढविण्यात आली होती. वनाधिकाऱ्यांसह तज्ज्ञ डॉक्टर, टॅक्विलायझर टीम आणि बचाव पथक सतत जंगल परिसरात तैनात होते. कॅमेरा ट्रॅप आणि पगमार्कच्या आधारे वाघिणीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. अखेर पवनपार तलावाजवळील जंगल भागात वाघिण दिसून आल्यानंतर वनविभागाच्या पथकाने नियोजनबद्ध कारवाई करत तिला डार्ट मारण्यात आला.

## ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना मिळकत पत्रिका मोफत मिळणार

■ मुंबई

**ग्रामीण** भागातील नागरिकांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांना मोफत मिळकत पत्रिका देण्याची घोषणा केली आहे. यासोबतच सनद शुल्क माफ करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामपंचायत नमुना क्रमांक ८ मधील दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय लागू होणार असून, ग्रामविकास विभागाला यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मिळकत पत्रिका हा महाराष्ट्रातील बिगरशेती जमिनी किंवा मालमत्तेच्या मालकीचा अधिकृत आणि कायदेशीर दस्तऐवज मानला जातो. ही पत्रिका महसूल विभागांतर्गत कार्यरत नगर भूमापन अधिकाऱ्यांकडून दिली जाते. मालमत्तेची मालकी, क्षेत्रफळ, भूखंड क्रमांक तसेच इतर महत्त्वाची माहिती या पत्रिकेत नमूद केलेली असते. भविष्यात जमीन किंवा मालमत्तेबाबत वाद निर्माण झाल्यास मिळकत पत्रिका महत्त्वाचा पुरावा ठरते. राज्यातील सुमारे २३ हजार ग्रामपंचायतींमध्ये ३९ लाख मालमत्तांचे मोजमाप पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे मालमत्ता ओळखपत्र आणि मिळकत पत्रिका वितरणाची प्रक्रिया आता वेगाने सुरू होणार आहे.

## बुलेट ट्रेनसाठी दुसरे कटरहेड घणसोली शाफ्टमध्ये दाखल

**प्रकल्पाच्या कामाला गती**

■ मुंबई

**मुंबई- अहमदाबाद** बुलेट ट्रेन प्रकल्पातील २१ किमी लांबीच्या बोगद्यासाठी, नवी मुंबईतील घणसोली येथील सावली शाफ्टमध्ये दुसऱ्या महाकाय टीबीएम अर्थात टनेल बोरिंग मशीनचे कटरहेड यशस्वीरित्या खाली उतरवण्यात आले आहे. या महत्त्वाच्या घडामोडीमुळे बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामाला चांगलीच गती मिळाली आहे.

१३.६ मीटर व्यास आणि सुमारे ३५० टन वजनाचे हे कटरहेड घणसोलीतील सावली येथून विक्रोळीच्या



दिशेने बोगद्याचे खोदकाम सुरू करेल. सध्या या मशीनची अंतिम जोडणी आणि चाचण्या सुरू असून, जुलैच्या पहिल्या आठवड्यात प्रत्यक्ष खोदकामास सुरुवात होईल. गेल्या आठवड्यात पहिले कटरहेड विक्रोळी येथील शाफ्टमध्ये उतरवण्यात आले होते. पहिल्या टीबीएम मशीनचे वजन ३०८० टन इतके होते. या दुसऱ्या मशीनचे वजन ३१८४ टन इतके आहे.

हे महाकाय कटरहेड एकाच बोगद्यातून हाय-स्पीड रेल्वेच्या अप आणि डाऊन दोन्ही मार्गांचे खोदकाम करण्यासाठी विशेषरित्या तयार केले गेले आहे.

## जनगणनेत लिंगायत धर्म नमूद करा जनबसवनंद स्वामींचे आवाहन

■ मुंबई

**जनगणनेत** लिंगायत धर्माच्या स्वतंत्र ओळखीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. केंद्र सरकारकडून होणाऱ्या आगामी जनगणनेत धर्माच्या चौकटीत 'लिंगायत धर्म' असा स्वतंत्र उल्लेख करावा, असे आवाहन बंगळूरू धर्मपीठाचे मठाधिपती जनबसवनंद स्वामीजी यांनी केले आहे. त्यांच्या या भूमिकेला नाशिक येथील श्री काळाराम मंदिराचे पुजारी सुधीरदास महंत यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. जनबसवनंद स्वामीजी म्हणाले की, भारतामध्ये सध्या जैन, बौद्ध आणि शीख या तीन भारतीय वंशाच्या धर्मांना अधिकृत मान्यता आहे. ब्रिटिश काळात लिंगायत समाजाला स्वतंत्र धार्मिक मान्यता होती. मात्र स्वातंत्र्यानंतर ती मान्यता संपुष्टात आली. त्यामुळे लिंगायत धर्माला सार्वजनिक आणि कायदेशीर मान्यता मिळवून देण्यासाठी आगामी जनगणना महत्त्वाची ठरणार आहे. या विषयावर संपूर्ण महाराष्ट्रात जनजागृती करण्यात येणार असून, २ जूनपासून सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथून मुंबईपर्यंत लिंगायत धर्म जनजागृती यात्रा काढण्यात येणार आहे.

## मध्य रेल्वेचा १० दिवसांचा ब्लॉक मेल, एक्स्प्रेस गाड्या अंशतः रद्द

**२९ मेपासून निर्णय लागू**

■ मुंबई

**सीएसएमटी** स्थानकातील फलाट क्रमांक १६ आणि १७ च्या विस्तारीकरणासाठी मध्य रेल्वेने २९ मेपासून १० दिवसांचा विशेष ब्लॉक घोषित केला आहे. या कालावधीत काही मेल-एक्स्प्रेस गाड्या सीएसएमटीऐवजी दादर किंवा ठाणे स्थानकावरच थांबवण्यात येतील. तर काही गाड्या अंशतः रद्द करत अन्य मार्गावर वळविण्यात येतील.

सीएसएमटी स्थानकात जे फलाट विस्तारीकरणाचे काम सुरू आहे, त्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून वाहतूक आणि वीजपुरवठा हा बंद ठेवण्यात येणार आहे. या दिवसात पायाभूत सुविधा, ट्रॅक आणि इतर तांत्रिक कामे केली जाणार आहेत. या बदलामुळे काही दिवस काही मेल आणि एक्स्प्रेस गाड्या या सीएसएमटीपर्यंत न जाता दादर किंवा ठाणे स्थानकापर्यंतच २९ मेपासून थेट पुढील १० दिवसांसाठी धावणार आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून रेल्वेकडून आधीच सूचना देण्यात आली आहे.

दादरपर्यंत धावणाऱ्या गाड्यांमध्ये गाडी क्रमांक १२१११ अमरावती-सीएसएमटी एक्स्प्रेस असणार आहे तर, ११००२ बल्लारशाह-सीएसएमटी नंदीग्राम एक्स्प्रेस, १२८१० हावडा-सीएसएमटी एक्स्प्रेस, ११०२० भुवनेश्वर-सीएसएमटी कोणार्क एक्स्प्रेस, २२१४४ बिदर-सीएसएमटी एक्स्प्रेस, २२१०८ लातूर-सीएसएमटी एक्स्प्रेस व २२१२० मडगाव-सीएसएमटी तेजस एक्स्प्रेस या गाड्यांचा समावेश असणार आहे.